# ।। भक्त माल ग्रंथ ।।

## मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:–    रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ भक्त माल ग्रंथ लिखंते ।।

।। दोहा ।।

सुखराम दास की बिणती ।। सुणो राम गरूदेव ।।
मे सरणागत आवीयो ।। दो अणभे तत भव ।।१।।

रामजी व गुरुदेवजी माझी विनंती ऐका,मी तुमच्या शरणात आलो आहो,तर मला अनुभवाचा (अनुभव घेतलेल्या) तत्वाचा भेद द्या. ।।१।।

जन सुखदेव की बीणती ।। सुणज्यो हर गुरूराय ।।
भक्त माल को भेद जुं ।। दीज्यो सरब बताय ।।२।।

माझी विनंती हर आणि गुरुराया ऐका,भक्तमाळेचा सर्व भेद मला दाखवून द्या. ।।२।।

च्यार जुगा मे संत हुवा ।। सो सब कहीये आण ।।
हिरदे हर गुरू बेसकर ।। बोलो निरमळ बाण ।।३।।

या चार युगात(सत्य,द्वापार,त्रेता,कलीयुगात)या चार युगामध्ये संत झाले,ते सर्व मला येऊन सांगा,हरी आणि गुरु माझ्या हृदयात बसुन तुम्हीस निर्मळ वाणी(बोली)बोला. ।।३।।

में बुध हीणा बापड़ा ।। पसुं पंखी जड़ जीव ।।
भक्त माल बिन थाह हे ।। किस बिध बरणु सींव ।।४।।

मी तर बिचारा बुद्धिहीन आहो,मी जड मतीचा पशुपाखरा सारखा आहो,याचा थाग काही येत नाही,मग मी याचे कोणत्या तऱ्हेने वर्णन करु व शेवट लावू. ।।४।।

अनंत जुगा आगे हुवां ।। संता वार न पार ।।
मेरी क्या जड़ जीव की ।। सब जन बरणु लार ।।५।।

हे संत तर अनंत युगापुर्वी झाले,या संताचा काही वारपार,थाग येत नाही,माझी या जड जीवाची काय बुद्धि आहे,की,मागे झालेल्या सर्व भक्ताचे वर्णन करु शकेल.।।५।।

संता के प्रताप सुं ।। गुरू सरणा गत जाय ।।
भक्त माल सुखराम क्हे ।। मे जुग बरणु आय ।।६।।

तर मी आता संताच्या प्रतापाने गुरुच्या शरणात जाऊन,ही भक्तमाळ या जगामध्ये वर्णन करीत आहो.।।६।।

साहिब किरपा किजीयो ।। गुरू गोविन्द हरी आन ।।
जिण बिध जेसा संत हुवा ।। त्यूं त्यूं कहो बखाण ।।७।।

हे मालका तुम्ही कृपा करा,गुरु व गोविंद आणि हरी तुम्हीही येऊन कृपा करा,ज्या विधीचे,ज्या प्रकारचे,जसे जसे संत झाले असतील,तसे तसे तुम्ही मला वर्णन करु सांगा. ।।७।।

सुणज्यो मे निरदोस हुँ ।। घाट बाध जस होय ।।
तुम हर बोलण हार हो ।। क्या जाणेगा कोय ।।८।।

तसे संताचे यश सांगण्यात माझ्याने कमी जास्त झाले,तरी मी तर निर्दोष आहो, माझ्यामध्ये तुम्हीच बोलणेवाले आहात,मग मला दोष कशाचा व कोणीही काय जाणेल, माझ्यामध्ये बोलणारे तर तुम्हीच आहात,मग कोणतेही संताचे कमी जास्त यश वर्णन झाले,तर त्याचा मला दोष कशाचा. ।।८।।

रेखता ।।

संत सुखरामजी अब सो बोलिया ।। क्रत प्रणाम लुळ पाय लागा ।।
किनक डंडोत पचास गुरूदेव कुं ।। ओर सब संत कुंई जाग जागा ।।९।।

आता मी बोलतो,प्रणाम करुन नमुन नमुन पाया पड्तो,गुरुदेवास पन्नास कन्नक दंड्वत आहेत व दुसरे सर्व संतासी जागच्या जागी जसे संत असेल,त्या मानाने सर्वास ठिक ठिकाणी दंड्वत आहे. ।।९।।

संत को साध अवतार जुग सिध हे ।। सरब सो बंदना मान लाज्यो ।।
भक्त को जस मे दिल भर केंत हुँ ।। सरब सो जन म्हाय आय रीज्यो ।।१०।।

संत व कोणी साधुचे अवतार जगामध्ये सिद्ध आहेत,ते सर्वजन माझी वंदना मानुन घ्यावी,भक्तांचे यश मी माझे दिल भरुन,मी सांगत आहे, सर्व संतजन आहा,ते माझ्या मध्ये येऊन रहा (व आपापले यश तुम्ही माझ्या तोंडावाटे बोलावून घ्या.) ।।१०।।

आद अनाद असंख जुग बीच मे ।। साध संसार में जोय होई ।।
दास सुखराम के श्रब चल आवज्यो ।। दोस मत दीजायो मोय कोई ।।११।।

आदि अनादि पासुन अनंत युगामध्ये जे जे या संसारामध्ये साधू झाले,ते सर्वही माझ्या आंतमध्ये चालून या व आपापले यश तुम्हीच सांगुन द्या,तुमचे यश कमी जास्त झाल्या बद्दल मला कोणी दोष देऊ नका. ।।११।।

मुझ प्रणाम डंडोत सब मानज्यो ।। संत गुरूदेव गोविन्द सांई ।।
बंस की लाज हरी आपको बिड्द हे ।। मध की चाल मत देख माही ।।१२।।

माझे तर तुम्ही सर्वांनी दंड्वत प्रणाम मानुन घ्या,सर्व संत व गुरुदेव व गोविंद आणि या स्वामी तुमच्या वंशाची म्हणजे मी ब्रह्माचे वंशातला आहो,त्या तुमचे वंशातील लाज व हरी तुमचे ब्रीद आहे,ते तुम्ही तुमचे ब्रीद सांभाळा,परंतु मधातील माझी चाड पाहू नका. ।।१२।।

ग्यान किरपाल गुरूदेव दयाल हो ।। मोख प्रममोख का आप दाता ।।
दस प्रकार की भक्त संसार में ।। जोय जन कीन सोई कहो गाथा ।।१३।।

तुम्ही गुरुदेवजी ज्ञान देणारे कृपाळु दयाळु आहा, मोक्षाचे व परममोक्षाचा तुम्हीच दाता

(देणारे)आहा,दहा तऱ्हेची भक्ती संसारात आहे,ज्या ज्या जनांनी या दशविधीच्या भक्तीतील ज्यांनी ज्यांनी,ज्या ज्या विधीची भक्ती केली,ती सर्व गाथा मला सांगा. ।।१३।।

आद अनाद को मूळ ले बोलज्यो ।। अरज गुरदेव सो मान लाजो ।।
दास सुखराम के भक्त को जस हे ।। भेद बिचार सो सर्ब दीजे ।।१४।।

आदि अनादीचे मुळ घेऊन मला सांगा,गुरुदेवजी,माझा अर्ज सर्व तुम्ही मानुन घ्या,हे मी सांगतो,ते भक्ताचे यश आहे,तर यांचा सर्व भेद व विचार मला द्या. ।।१४।।

।। दोहा ।।

सुखराम कहे सब सांभळो ।। चित मन सुरत लगाय ।।
भक्त माळ जस सुणत रे ।। अंग अंस सब जाय ।।१५।।

मी सांगतो ते सर्व चित्त व मन लावुन ऐका,ही भक्तमाळ ऐकल्याने सर्व पापाचा अंश चालला जाईल.(निघुन जाईल) ।।१५।।

भ्रम क्रम अज्ञानता ।। होय तिवर को नास ।।
भक्त अंस घट ऊपजे ।। मिले आद घर बास ।।१६।।

ही भक्तमाळ ऐकल्याने भ्रमाचा कर्माचा व अज्ञानतेच्या अंधाराचा नाश होऊन जाईल व भक्तीचा अंश घटात उत्पन्न होईल व आदि घरी जाऊन वस्ती करेल. ।।१६।।

रेखता ।।

बोलीया संत सुखराम सो आद ले ।। ब्रम्ह की ओड सुं संत बरणे ।।
धिन क्रतार सो केवली ब्रम्ह हे ।। देह धर सकल सो रेत सरणे ।।१७।।

आता आदि पासुन संताचे वर्णन मी सांगतो,ब्रह्मपासुन आलेल्या संताचे मी वर्णन करुन सांगतो,हे तू कर्तारा धन्य आहेस व कैवल्यब्रह्म तू धन्य आहेस,हे सर्व देह धारण करुन तुझ्या शरणात रहात आहोत. ।।१७।।

पांच पर तीन तत्त आद सु ऊपना ।। मांड बिस्तार हरी खूब मांडी ।।
रूप अनरूप आकार बिन देव तूं ।। छिनक के मांह पल जाह छाडी ।।१८।।

हे पांच तत्व व तीन गुण हे आदीच्या पहिल्या प्रथम उत्पन्न झाले,या सृष्टीचा विस्तार हरीने खुब मांडला,तुला काही रुप नाही,तू अरुप देव आहे व आकाराशिवाय तू निराकार देव आहे,तू एका क्षणात व एका पळात (        )।।१८।।

मुख भर तोह क्या बिड़द दे गाईये ।। धिन तुही धिन तुही रामराया ।।
दास सुखराम के तीन तिरलोक में ।। तोहि शिर ओर नही देव काया ।।१९।।

तोंड भरुन तुझे ब्रीद काय गाऊ,हे रामराया,तु धन्य आहे,तुला धन्य आहे,या तिन्ही लोकांत त्रिलोकी मध्ये तुझ्यावर दुसरा कोणीही देव नाही. ।।१९।।

धरण ब्रहमंड आकास मे ध्यान हे ।। सकळ नख चख मे साम सोई ।।
केवळी ब्रम्ह आरब करतार सुं ।। हंस प्रमहंस में अलख होई ।।२०।।

तुझे धरती व ब्रम्हंड व आकाशात ध्यान आहे,कारण तू सर्वव्यापी आहे,सर्व नखापासुन डोक्यापर्यंत तू व्यापुन राहीला आहे,कैवल्यब्रम्ह तूच आहे व कर्तारही तुच आहे,आरब्ब (पालन कर्ता)ही तूच आहे,तू हंसात व परमहंसात आहे,परंतु अलख(लखण्यात येत नाही,असा)आहे, ।।२०।।

राम रहीम रमत ही तुं धिन हे ।। आप को पार कोई नाहि लेवे ।।
तारणो होय ज्या अंग में प्रगटे ।। मारणो होय ज्या माहे ऊठे ।।२१।।

तू राम आहे,(सर्वांत रमून राहीला आहे)तू रहीम आहे,(तु सर्वावर रहम आहे)तू सर्वात रमून राहीला आहे,तु धन्य आहे,तुझा पार कोणासही घेता येत नाही,तुला ज्यास तारावयाचे असेल त्याचाच अंगात तू प्रगट होऊन जातो व तुला ज्यास मारावयाचे असेल त्यास तू त्याच्या अंगात प्रगट होऊन जातोस व त्यास मारुन टाकतोस.।।२१।।

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-।।\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-।।

दास सुखराम के धिन करतार तुं ।। राम बेमुख कहु नाह छूटे ।।२२।।

तू करतारा धन्य आहे,जे रामजीसी बेमुख मनुष्य आहेत,ते कोठेही सुटणार नाहीत. ।।२२।।

ब्रम्ह सुं सुन सुण सुन को मुन हे ।। मुन सुं बाय प्रकास होई ।।
तेज मे आन सो निरंजन ऊपनो ।। प्रथ मी मुळ वां होय लाई ।।२३।।

ब्रम्हपासुन शुन्य झाले व शुन्यापासुन मुन्न झाले(आकाश झाले)व मुन्न आकाशापासुन वायु झाला व वायुपासुन अग्नी झाला,अग्नीपासुन पाणी उत्पन्न झाले व त्या जळातुन पृथ्वी उत्पन्न झाली, ।।२३।।

प्रगती मुन में बिरज तत्त ज्यानीयो ।। सगत ओऊँकार यांहाँ जन्म जाणो ।।
म्हा मुन आद नारायण लिछमी ।। तीन सो देव को श्रूप ठाणो ।।२४।।

शक्ती ॐ काराच्या येथे जन्मली,महाशुन्य आदि पासुन नारायण व लक्ष्मी उत्पन्न झाले, त्या शक्ती पासुन तीन देवाचे स्वरुप झाले.।।२४।।

अंस सरूप ऊंसास सो ऊपनो ।। जोत मुनी आण प्रकास कीया ।।
दास सुखराम केहे जक्त सहे तजुं ।। मांड सीव को भेव दीया ।।२५।।

त्याचे अंश स्वरुप सर्वात उजेड झाला,ती ज्योती मुनी येऊन प्रकाश केला,शक्ती सहीत येऊन पृथ्वीच्या रचनेच्या शिवास भेद दिला. ।।२५।।

विस्न ब्रम्हा ज्युं सिव सो प्रगटया ।। तीन तिरलोक रचाय दिया ।।
देव मानव पस पंख बनास्पती ।। च्यार सो खाण मे सर्ब कीया ।।२६।।

विष्णु,ब्रम्हा व शिव हे प्रगट झाले व तिघांनी त्रिलोकीची रचना केली,या पृथ्वीवर यांनी देव,मनुष्य, वनस्पती आणि हे पशू चार खाणीतुन सर्व केले.।।२६।।

तीन गुण मांड सो जीव ले बेचीया ।। देव सब लोक को बंध बांध्यो ।।
इन्ड कटाक्ष चहुँ दिस सो फेलीयो ।। क्रोड पचास लग मेर सांध्यो ।।२७।।

व तीन गुण(रज,तम,सत्व)या पृथ्वीतील जीवास पाठवून दिले,देवांचा व सर्व लोकांचा वेगळा वेगळा बांध बांधला, हा अंड्कटाक्ष चारी दिशेस पसरला,तर याची पन्नास कोटी योजन पर्यंत मेर बांधली.।।२७।।

लिछमी गवर ज्यां सेज सायत्री ।। सगत प्रणाम संजोग कीया ।।
दास सुखराम के ऋष वा ऊपना ।। उलट ब्रम्हा कुं ग्यान दीया ।।२८।।

लक्ष्मी,गौरी व सावित्री ह्यांनी शक्तीच्या प्रमाणे संयोग केला,(स्त्री पुरुषांनी मैथुन करुन प्रजा उत्पन्न करावा व तो मैथून कसा करावा,कोणत्या तऱ्हेने केला पाहिजे,याची सर्व माहीती शक्तीने दाखवून दिली,शक्तीने दाखविण्यापुर्वी स्त्री पुरुषास मैथून करण्याची हिकमत माहीत नव्हती,शक्तीने दाखविले प्रमाणे,विष्णूसी लक्ष्मी,ब्रह्मासी सावित्री,शंकरासी गौरी)या प्रमाणे संयोग केला,याच्यात ऋषी उत्पन्न झाले,यांनी उलटुन ब्रह्मास ज्ञान दिले. ।।२८।।

च्यार सो बेद ब्रम्हाजी बोलीया ।। मेर म्रजाद सब बांध दीवी ।।
सुभ असुभ ऊपाय संसार में ।। जुग की जुग जिण मांह कीवी ।।२९।।

ब्रह्माने चार वेद सांगितले,त्या वेदामध्ये सर्व मेर मर्यादा बांधुन दिली,शुभ व अशुभ सर्व संसारातील उपाय जगाची जगात ज्याची त्याची जगात केली.।।२९।।

बावना मांही सब नांव ले आवीया ।। दस सो मात में भ्यास सारी ।।
राग छत्तीस में कंठ की मोड़ हे ।। तत्त को भेव सुण भेद लारी ।।३०।।

या बावन अक्षरात सर्व लिहीता येतात व दहा मात्रामध्ये एक सर्व भाषा बोलता येते व छत्तिसही तऱ्हेचे राग कंठाचा मोडीत आहेत व या तत्वाचा भेद या भेदाच्या मागे आहे. ।।३०।।

जुग का जुग अवतार सो बर्णीया ।। देत ज्युं दाण वा भाष दीया ।।
दास सुखराम के धिन ब्रम्हा तु ।। ध्रम हर क्रम का धाम कीया ।।३१।।

व युगाचे युगात अवतार सर्व सांगितले,राक्षस व दैत्य व अवतार हे सर्व सांगुन दिले, ब्रह्मा तु धन्य आहे,तू धर्माचे व कर्माचे जीवाकरीता वेगळे वेगळे धाम केले. ।।३१।।

साठ सो पुत्र नारद के ऊपना ।। व्रस का नाम अे रख सारा ।।
बीस सो बिस्न भगवान कुं सुंपीया ।। बीसही ईस के चरण प्यारा ।।३२।।

नारद जेव्हा स्त्री झाला होता,तेव्हा त्या नारदास साठ पुत्र झाले,त्याचे साठ संवत्सराचे वेगळे वेगळे नांव ठेवले,त्यातील वीस संवत्सर विष्णुसी दिले,(त्याची नावे ८भाव, ९ युवा,१० धाता,११ इश्वर,१२ बहुधा,१३ प्राथी,१४ विक्रम,१५ व्रष,१६ चित्रभानु,१७

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

सुभानु,१८ तारण,१९पार्थिव,२० व्यव,२१ सर्व जीत,२२ सर्वधारी,२३ विरोधी,२४ विक्रती,२५ खर,२६ नंदन,२७ विजय)व यातील वीस संवत्सर महादेवाच्या चरणी अर्पण केले,(त्यांची नावे:–२८ जय,२९ मन्मथ,३० दुर्मुख,३१ हेमलंबी,३२ विलंबी,३३ विकारी,३४ शार्वरी,३५ प्लव,३६ शुभकृत,३७ शोमन,३८ क्रोधी,३९ विश्वासु,४० पराभव, ४१प्लवंग,४२ किलक,४३ सौम्य,४४ साधारण,४५ विरोधकृत,४६ परीधावी, ४७ प्रमांदी)व मागे राहीले ते ब्रह्माने आपल्या शरणी घेतले,(मागे राहीलेले २० त्यांची नावे :–४८ आनंद,४९ राक्षस,५० अनल,५१ पिंगल,५२ कालयुक्त,५३ सिद्धार्थी,५४ रौद्र,५५ दुर्मती,५६ दुंदुभी,५७ रुधिरोद्गारी,५८ रक्ताक्षी,५९ क्रोधन,६० क्षय,१ प्रभव,२ विभव,३ शुक्ल,४ प्रमोद,५ प्रजाप,६ अंगिरा,७ श्रीमुख हे ब्रह्मादेवाने घेतले), ।।३२।।

**दुज की सरण सो बीस रेविया ।। ऋष यूं देवता बेच लीया ।।**
**ओसरा ओसरी सरब सो प्रगटे ।। ताह की बीसीया नाम दीया ।।३३।।**

या प्रमाणे हे सवंत्सर तीन्ही लोकांनी वाटून घेतले,याचे हे संवत्सर तिन्ही देवांनी वाटून घेतले,यांचे हे संवत्सर सालो साली एक एक प्रगट होत असतात व ते आपापला गुण वेगळा वेगळा प्रगट करुन देत असतात,या संवत्सराचे फळ ज्योतीषात वेगळे वेगळे सांगीतले आहे,ते आपापला गुण वेगळा वेगळा प्रगट देत असतात,त्यांतील एक संवत्सर साठ वर्षाने येत असतो,तर हे वीस वीस वेगळे वेगळे वीसी नांव सांगतात, लोक म्हणत असतात,ही ब्रह्माची विसी आहे,विष्णुचे संवत्सर आले,म्हणजे ही विष्णुची वीसी आहे व महादेवाचे संवत्सर आले,म्हणजे ही महादेवाची वीसी आहे असे म्हणतात. ।।३३।।

**देव तिण देव का ऋष यां प्रगटे ।। जक्त मे भक्त सो होय जोर ।।**
**दास सुखराम के ग्यान कर देखीयो ।। अमल की बात कुं कोन मोर ।।३४।।**

हे संवत्सर ज्याची वीसी आली,म्हणजे त्या प्रमाणे संसारात फळ देत असतात,ज्या देवाचे संवत्सर येतात,त्याच देवाची भक्ती येथे त्या वीस वर्षात जास्त फैलत असते,ते ज्ञान करुन पाहुन घ्या,परंतु याच्यावरील अमलची(वरीष्ठांची गोष्ट)(ब्रह्मची गोष्ट)हे कोणी तोडू शकत नाही. ।।३४।।

**विसन की बीसीया विसन जन ऊपजे ।। दुज की बीसीया बीप्र जोरे ।।**
**शिव की जाण सिन्यास में पोख हे ।। ब्रम्ह की भक्त कौ नहि मोरे ।।३५।।**

विष्णुचे वीस संवत्सर येतात,तेव्हा या वीस संवत्सरामध्ये विष्णुचे संवत्सरात विष्णुचे संत उत्पन्न होतात व विष्णुची भक्ती जोरात येते व विष्णुचे संवत्सरात शेतीची उत्पत्ती करता येते,लोक खाऊन पिऊन सुखी असतात व ब्रह्माचे वीसीचे संवत्सर येतात, त्यावेळी ब्राह्मणाचा धर्म जोरात येतो,(ब्रह्माने वीस संवत्सरात प्रजेची व जीवांची उत्पत्ती

जास्त होते)व महादेवाची वीस संवत्सरात सन्यासी जास्त असतात व संन्यासाचा धर्म जोरात चालतो,महादेवाचे संवत्सरात जीवांचा नाश जास्त होत रहातो,मनुष्याचा संव्हार हर तऱ्हेने रोगाने किंवा लढाईने,मारामारीने व दुष्काळाने जास्त होत असतो व दुसरे जीवांचाही या वीस संवत्सरात जास्त नाश होत असतो,हे सर्व विशोत्री प्रमाणे भक्ती कमी जास्त होते, परंतु ब्रह्मची भक्ती केव्हांही कोणीही पलटावू शकत नाही.।।३५।।

**फेर सुण देवतां गुंझ ओ बांधियो ।। भक्त बरणाम सो जीव लेणा ।।**
**जाब ते काज जुग दरसणी मे लीया ।। यूं ऊत का जाब सो इत केणा ।।३६।।**

अधिक या देवांनी ब्रह्मा,विष्णु,महादेवांनी हे गुह्य बांधले.। भक्त बर्णाव सो जीव लेणा । (आपापली भक्ती करणारे आपापले जीव वाटून घेतले)( )व या जगामध्ये आपल्या वर्णाच्या धर्माचा जाप्ता करण्याकरीता सहा दर्शने पाठविले,ते दर्शणी करण्याकरीता आले,की,तेथील जबाब येथे सांगण्या करीता आले, ।।३६।।

**ब्रम्ह की भक्त या तीन मत बाहीरी ।। ताहि पच सुण हे देव धारे ।।**
**दास सुखराम के सरण बिन जीवरे ।। तांही कुं सोझ कर काळ मारे ।।३७।।**

परंतु ही ब्रह्मची भक्ती या तिघांनाही(ब्रह्मा,विष्णु ,महादेव)यांच्या मतासी निराळी आहे, या ब्रह्मच्या भक्तीस हे देवही(ब्रह्मा,विष्णु,महादेव)ही धारण करतात व ब्रह्मची भक्ती करण्यास पचतात,परंतु त्या ब्रह्मच्या शरणात नसलेले जीवास काळ शोधून शोधून मारतो. ।।३७।।

**क्रत पेदास दुज जीव अस थूलसो ।। बिसन भगवान पर पोष देवे ।।**
**भ्रम का जाळ सो सगत हे हात हे ।। मार सिंघार जुं शिंभू लेवे ।।३८।।**

या जीवांची उत्पत्ती ब्रह्मा करीत असतो, जीवांचे स्थुळ शरीर जीवास ब्रह्मा देत असतो व विष्णु सर्व जीवांचे परीपोषण करीत असतो(स्थिती करतो)व या सर्व जीवांस भ्रमात टाकण्याकरीता भ्रमाचा जाळ शक्तीच्या हातात आहे,शक्ती सर्व जीवास भ्रमात टाकीत असते व सर्व जीवास मारणे व संव्हार करणे हे शंभुच्या स्वाधीन आहे,जीवास मारणे व जीवांचा संव्हार शंभू करीत असतो. ।।३८।।

**राकसी अंस संसार मे ऊपजे ।। भक्त मे आण जब भीड़ पारे ।।**
**आप क्रतार अवतार तब धार के ।। दुष्ट कुं घेर शिर घाव मारे ।।३९।।**

राक्षसी वंश संव्हारामध्ये उत्पन्न होतात,ते राक्षस येऊन भक्तामध्ये संकट पाडतात, तेव्हा तो कर्तार आपण स्वत: अवतार घेऊन,त्या दुष्ट राक्षसास घेऊन त्या राक्षसाचे शीर मारतो,(घाव मारुन तोडतो).।।३९।।

**राकसी होय जड़ जीव इण बात सुं ।। संत सराप दे आड कोई ।।**
**दास सुखराम के विसन की पोल ज्यां ।। दाणवा सरब उन जाग होई ।।४०।।**

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

हे राक्षस या पापाच्या योगाने होत असतात,हे संताच्या आड्वे येतात,तेव्हा संत यांना शाप देत असतात,त्या संताच्या शापामुळे हे राक्षस होत असतात,हे विष्णुच्या दरवाज्या जवळ द्वारपाळ(दरवाण)तेथून ते सर्व राक्षस होतात(विष्णुचे द्वारपाळ सर्व राक्षस होतात). ।।४०।।

क्रोड तेतीस सुण देवता जात हे ।। ताय मध ईद ईधकार होई ।।
सेस अठ्यास सुत ब्रम्ह के ऊपना ।। ताहि सुं मांड बिस्तार लोई ।।४१।।

या देवाच्या तेहतीस कोटी जाती आहेत,त्या तेहतीस कोटी देव देवतामध्ये इंद्राचा अधिकार सर्वात जास्त आहे,(इंद्र हा तेहतीस कोटी देवांचा राजा आहे)ब्रह्माचे अठ्याऐंशी हजार पुत्र उत्पन्न झाले,त्यात ब्रह्माच्या पासुन या पृथ्वीचे लोकांचा विस्तार झाला. ।।४१।।

सिनकादिक सुण बिसन का च्यार हे ।। शिष का तीन गण मान लीजे ।।
पूरण ब्रम्ह या सकळ मे रम रहया ।। भज करतार कुं काज कीजे ।।४२।।

त्यातील चार सनकादीक(सनक,सनांदन,सनातन,सनतकुमार)हे चार विष्णुचे शिष्य झाले व शिवाचे तीन गण झाले,तो पूर्णब्रह्म या सर्वामध्ये रमुन राहीला आहे,(रमुन राहीला आहे म्हणून त्यास राम म्हणतात),त्या कर्तारास भजून आपले कार्य करुन घ्या. ।।४२।।

सरब सो देव आधीन उण देव के ।। भीड़ मे चाल अवतार आवे ।।
दास सुखराम के सारदा नारदा ।। रिष जोगीसरा सरब गावे ।।४३।।

हे सर्व देव त्या देवाच्या आधीन आहेत,त्यांच्या आधीन संतावर संकट पड्ले,म्हणजे तो चालून येऊन अवतार घेतो,शारदा व नारद हे सर्व ऋषी व सर्व योगेश्वर त्यास भजतात. ।।४३।।

श्लोक ।।

कळ जुग मधे ।। रिष सुखरामं ।। बोलेस बाणी ।। चड़ सतधाम ।।
भक्त सी माळा ।। पोऊस अैसे ।। जुग जुग संत हुवा सिध तेसे ।।४४।।

व कलीयुगामध्ये ऋषी सतगुरु सुखरामजी महाराज होवुन गेले, ते सतगुरु सुखरामजी महाराज सत्त धामास चढून वाणी(ज्ञान)बोलले,आता मी भक्तमाळ(भक्तांची माळ या तऱ्हेने गाठतो(गुंफतो),युगा युगामध्ये जसे जसे संत झाले,तसे तसे या भक्त माळे मध्ये गाठतो.या चार युगाच्या आदि कृत युगामध्ये ब्रह्माच्या राज्यात तपश्चर्या व ध्यान साधत असत. ।।४४।।

जुग च्यार आदं ।। त्रित जुग मधें ।। राजास ब्रम्हा तप ध्यान संधे ।।
अेकीज सम्यं पुस्तंग रागो ।। हरे बेद च्यारूं संखासुर भागो ।।४५।।

एकेवेळी लक्ष्मीने एक पुत्र उत्पन्न केला,तो पुत्र असा दुष्ट होता,की,त्याने ब्रह्माचे वेद चोरुन लक्ष्मीजवळ घेऊन पळून गेला.तेव्हा लक्ष्मी आपले दुष्ट कर्म .पाहून,त्यास म्हणाली, अरे,हे तु काय केले,तुझा बाप झोपेतुन उठला म्हणजे तुला मारीन,तर तु पळून जा, तेव्हा ब्रह्माने पुकार केली,(रिपोर्ट केला)तेव्हा चोरास धरण्याकरीता विष्णुने हा शंखासुर वेद पाण्यात घेऊन बसला होता. ।।४५।।

**तब राम सांमो धर मच्छ रूपं ।। किवि बेद बारंग ।। तपे धाम धुपं ।।**
**धऱ्यो मछ रूपं धसे संमद मांही ।। जोय सब नीरं ।। पायो दुष्ट नाही ।।४६।।**

त्यास धरण्याकरीता विष्णुने मत्स्याचे रुप धरुन गेला,हा शंखासुर तेथुन पळाला व पाठीमागे लागलेला विष्णू येत आहे,असे पाहून,तो विष्णुस भिऊन,तेथे घोडे चरत होते,त्या मध्ये घोडा होऊन गेला,तेव्हा विष्णू ह्याग्रीवचा अवतार घेऊन गेला व आपल्या जाती स्वभावा प्रमाणे सर्व घोड्यांचे नाक हुंगु लागला.।।४६।।

**तबे कछ रूपं ।। धऱ्यो राम सोही ।। गिलिगार सारी लियो जख जोही ।।**
**करपांण स्याया संखो मरोडे ।। लिया बेद चारी दातो नो तोडे ।।४७।।**

घोड्याचे नाक हुंगता हुंगता शंखासुर घोडा झालेला होता,त्याचे जवळ गेला व त्याने नाकास नाक लावून त्याच्या आंत असलेले वेद श्वासावाटे ओढून घेतले व तो शंखासुर भिऊन पळून गेला व समुद्रात जाऊन बसला. ।।४७।।

**दीया दुज सेती सुणो बेद च्यारी ।। गये मछ कछं सबे काज सारी ।।**
**अबे अवतार सुणो अेक दाणु ।। बराहा नर सिंघ जुगो बखाणू ।।४८।।**

तेव्हा विष्णु मस्त्याचे रुप धारण करुन पाणी शोधु लागला,त्या धामांत समुद्रात तपू लागला,तेव्हा शंखासुर भिऊन समुद्रात गाळामध्ये जाऊन लपून बसला,या मतलबाने गाळामध्ये धसला,की मच्छ गाळामध्ये धसु शकत नाही,मच्छ फक्त पाणी पाहील व मी पाण्यात सापडलो नाही म्हणजे वापस चालला जाईल,मी गाळात धसलो म्हणजे मच्छ माझ्या जवळ येणार नाही,परंतु विष्णुस शंखासुर पाण्यात न मिळाल्यामुळे,शंखासुर गाळात जरुर धसला असेल,असे समजुन विष्णू कासव होऊन गेला. तेव्हा कासव होऊन गाळ गिळू लागला,तेव्हा शंखासुर भ्याला की,आता मला शोधुन मारून टाकेल, म्हणून तो तेथूनही पळाला व एक विष्टेची गड्द होती,त्यांत शंखासुर धसुन गेला व समजला,विष्णु हा देव असल्याकारणाने या विष्टेच्या गंजाजवळ येणार नाही व आता तरी मला तो विष्टेतुन काढु शकणार नाही,कारण विष्णु हा देव आहे,तो लोकांच्या विष्टेस शिवणार नाही,इकडे विष्णुने कच्छ रुपाने सर्व गाळ खाऊन टाकला तरी,त्यास तो दुष्ट शंखासुर मिळाला नाही,तेव्हा त्याच्या पायाच्या चिन्हा चिन्हाने विष्टेच्या गंजाजवळ आला व विष्णुने विचार केला,या विष्टेतुन याला कसे काढू ,विष्णुने विचार

केला,दुसऱ्या रुपाने तर विष्टेस शिवता येत नाही,विष्टेस तर फक्त डुक्करच शिवत असतो व उखरतही असतो व खातही असतो,म्हणून विष्णुने डुक्कराचे रुप धारण करुन,विष्टेच्या गंजास उखरुन,शंखासुरास दोन्ही हातात धरुन जोराने मुरगाळले,त्या दिवसापासुन शंखास एका हाताने धरलेले बोटाचे चिन्ह आंत असतात व दुसऱ्या हातास शंखास मुरगाळलेले मुरड्चे चिन्ह,शंखाचे दुसरीकडे अजुन उत्पन्न होत असतात, या प्रमाणे शंखासुरास मारुन ब्रह्माचे वेद दिले. या तऱ्हेने आपले कार्य करुन मच्छ कच्छ चालले गेले,आता अधिक एक राक्षसाचा अवतार ऐक,त्यांचे करीता वराह आणि नरसींह जगामध्ये अवतार झाला. ।।४८।।

**हिर्णास दाणू दुजोबर जाणी ।। फटे ऊर जोसां तबे बुझे आणी ।।**
**मुझे आप असो बताओस आई ।। लडे बांह जोड़ी करूं जुध जाई ।।४९।।**

हिरण्याक्ष हा राक्षस द्रिजा(ब्रह्माच्या)वरदानाने अती प्रबळ झाला,हा इतका बळवंत झाला की,याने लढाई करुन सर्वास जिंकून घेतले व लढाई करीता कोणी उरला नाही,जेव्हा अधिक जोरात आला,जोर हृदयात मावेना व याचे भुज बाहू स्फुरण पांवू लागले,(लढाई करण्याकरीता फुरु फुरु लागले). ।।४९।।

**तबे दुज बोले नहि कोय असा ।। करे हात जोड़ा लडे तोह जेसो ।।**
**हिर्णाष केहे जुग रहुँ कौण घाटे । मेरी ऊर बाहियाँ नितो बाहोत फाटे ।।५०।।**

तेव्हा हा ब्रह्माजवळ येऊन विचारु लागला,मला कोणी माझ्यासी लढणारा असा कोणी दाखवा,की,त्याच्यासी भांडुन माझ्या मनाची हौस फेडीन,तुम्ही असा मला कोणी दाखवा,की,त्याच्यासी युद्ध करुन मी माझा काढीन,तो बाहु मिळवून माझ्यासी युद्ध करेल,असा कोणी दाखवा,त्याच्यासी मी जाऊन युद्ध करीन. ।।५०।।

**तबे दुज धूजे काहां अब कीजे ।। दाणु बोहोत जोरे किम बस लीजे ।।**
**विस्न शिव पासे गये दुज धाई ।। उपनो हे दाणु करो जुध आई ।।५१।।**

तेव्हा ब्रह्मा म्हणाला,तुझ्या बरोबरीने युद्ध करणारा असा कोणीच नाही, की,तुझ्यासी बाहुसी बाहु भिड्वून तुझ्यासी युद्ध करेल,असा कोणी संसारात दिसत नाही,तेव्हा हिरण्याक्ष म्हणाला,आता मी कोठे जाऊन राहू ,माझ्यासी लढाई केल्याशिवाय माझ्या हृदयात जोम आहे,त्याच्याने माझे बाहू नित्या नित्य स्फुरण पावून राहीले आहेत. तेव्हा ब्रह्मा कापू(धंजू)लागला,की,आता काय करावे,युद्ध करण्याकरीता हा माझ्यासी जुटून गेला,तर मी काय करणार,याच्याशी युद्ध करण्याइतकी तर माझ्यात ताकद नाही,असे पाहून ब्रह्मा भिऊन धुंजू लागला,की,आता काय करावे,हा राक्षस फार जोरात आला आहे,याला आता कसे वश करावे,तेव्हा ब्रह्मा धाऊन विष्णू व महादेवाजवळ गेला व ब्रह्मा म्हणाला,हा राक्षस उत्पन्न झाला आहे,याच्यासी युद्ध करा. ।।५१।।

तबे शिव बोले नहि पांण मोई ।। कहो बिस्न सेती करे जुध जोई ।।
तिहुँ देव अेके करी गुष्ट आई ।। दाणु बोहोत जोरे संभे नहि भाई ।।५२।।

तेव्हा महादेव म्हणाला,या राक्षसाशी युद्ध करण्याची माझ्यात ताकद नाही,आपण चालून विष्णुस सांगा,म्हणजे विष्णु याच्याशी युद्ध करेल,तेव्हा या तिन्ही देवांनी मिळून गोष्ट विचार केली,विष्णूही म्हणाला,की,हा दानव फार जोरदार आहे,हा आपल्याने सांभाळल्या जाणार नाही. ।।५२।।

हवे दुज बोले सुणो हिर्णाका ।। तोसे जुध करणे हारो ब्रम्ह बांका ।।
कहे हिर्णाको बतावोस मोई ।। किण देश जागा रह ब्रम्ह सोई ।।५३।।

तेव्हा ब्रह्मा म्हणाला,हिरण्याक्ष ऐक,तुझ्यासी युद्ध करणारा एक ब्रह्मच आहे,तेव्हा हिरण्याक्ष म्हणाला,तो ब्रह्म मला दाखवा,तो कोणत्या देशात आहे,तो ब्रह्म कोणत्या ठिकाणी आहे,तो ब्रह्म कोणत्या जागी रहात आहे. ।।५३।।

कहे दुज भेवा नहि ठोड़ ठामा ।। मुझ तुझ मांही रमे स्याम रामा ।।
किसे बेत पाऊँ लड्डु केम सोई ।। कहे हिर्णाक बतावेस मोई ।।५४।।

तेव्हा ब्रह्मा म्हणाला,त्याची राहण्याची जागा किंवा ठिकाण कोठेही नाही,तो तुझ्यात आणि माझ्यात तो स्वामी सर्व ठिकाणी व्यापून राहीला आहे,तेव्हा हिरण्याक्ष म्हणाला, त्याचा गांव नाही,त्याचा देश नाही,त्याचा ठिकाण नाही, तो तुमच्यात आणि माझ्यात सर्वांत आहे म्हणता,त्याच्यासी मी कोणत्या तऱ्हेने भांडू,हिरण्याक्ष म्हणतो,मला डोळ्याने दाखवा,असे मानणार नाही. ।।५४।।

कहे दुज भेवा सुणो जख आणी ।। आराध्या आवे बिरोध्या जाणी ।।
हिर्णाक तब मन आ उर धारी ।। कर धर ऊँधी मारूँ रेत सारी ।।५५।।

तेव्हा ब्रह्मा म्हणाला,हे यक्षा ऐक,तो ब्रह्म त्याची आराधना करण्याने येतो,तु त्याची आराधना करुन बोलाव किंवा त्याचा विरोध कर,म्हणजे तो येऊन जाईल,तेव्हा हिरण्याक्षाने असा मनांत विचार केला की,या धरतीस हातात धरुन उलटी करुन सर्व रयतेस मारुन टाकीन, तेव्हा आपच येईल. ।।५५।।

आंकस मारे धरण हलाई ।। तने अंग काया पसिनोस आई ।।
फेरेस हाथं भ्रगुटी ज सीसा ।। तब जंवार जेसा कर बिच दीसा ।।५६।।

तेव्हा हिरण्याक्षाने धरतीवर अंकुश मारुन,धरती हालविण्यास जोर येऊन,त्याच्या अंगावर(शरीरास)घाम आला,तो घाम पुसरण्याकरीता आपला हात कपाळावर भृगुटीवर फिरवून घाम पुसूं लागला,तेव्हा त्याच्या हातात जवारीच्या दाण्यासारखा फफुला आल्यासारखा दिसला. ।।५६।।

कर बीच निरखे क्या यह होई ।। अठा पहल ऐ वो देख्यो न कोई ।।

बघे इण्ड असे घड़े मुण क्रावे ।। अब जख हाथ संभे नहि मावे ।।५७।।

तेव्हा हिरण्याक्षाने हातामध्ये पाहीले,की,हे काय झाले,याच्या पुर्वी असा माझ्या हाता मध्ये फफोला झालेला केव्हाही पाहीला नाही,तो जवारी एवढा फफोला वाढून अंड्या एवढा झाला,अंड्या एवढ्याचा रांजणा एवढा झाला,आता तो इतका मोठा झाला,की, राक्षसाच्या हातात सांभाळलाही गेला नाही व हातात मावेनासा झाला. ।।५७।।

तब राव दाणु कर हाथ डाऱ्यो ।। इण्ड मांहि भगवान अवतार धाऱ्यो ।।
मुख मांही तिरलोक सब जुग लीया ।। बाराह हिर्णाक इम जुध कीया ।।५८।।

जेव्हा हात सांभाळल्या गेला नाही,तेव्हा त्या हिरण्यक्षाने हात खाली टाकला,त्याच्या त्या हातातील अंडातुन तो पुर्वी शंखासुरास मारण्याकरीता डुक्कर आला होता,तोच वराह रुपाने त्यातुन अवतार निघाला व त्याने तोंडात जगास व त्रिलोकीस घेऊन घेतले,तो वराह हिरण्याक्ष राक्षसासी लढु लागला व आता वराह व हिरण्याक्ष असे युद्ध करु लागले. ।।५८।।

जुटे सेस बरसं कियो जुध भारी ।। मारे हिर्णाक किया टूक फारी ।।
प्रथी प्रतपाल इस्या रामराया ।। जिवा काज दोड़े धरे रूप आया ।।५९।।

या तऱ्हेने हजार वर्ष पर्यंत एकमेकासी जुटून फार भारी युद्ध केले,मग हजार वर्ष युद्ध करुन हिराण्यक्षास मारुन त्यास चिरले,त्याचे तुकडे तुकडे केले,ह्या पृथ्वीचा प्रतिपाळ करणारा असा तो राम आहे,तो जीवांच्या कामासाठी डुकराचे रुप घेऊन धाऊन आला. ।।५९।।

सुणो संत सारा सबे मांड आणी ।। हरे ब्रम्ह साचा जपो सेंग प्राणी ।।
सबे मांहे देवा भरपूर होई ।। केहे सुखदेवजी रटो सर्ब जोई ।।६०।।

सर्व संतही ऐका व पृथ्वीचे सर्व लोकही ऐका,तो ब्रह्म खरा आहे,सर्वही प्राणी त्यास ऐका व जपा(भजा),तो देव सर्वांमध्ये भरपुर आहे,त्यास सर्व जणही पाहून त्याचे रटण करा.।।६०।।

प्रब्रम्ह केसो करतार सांई ।। तिर लोक ज्याहाँ त्याहाँ भरपूर माई ।।
सास उसासे हर जाप कीजे ।। केहे सुखदेवजी यूँ मोख लीजे ।।६१।।

ज्यास परब्रह्म म्हणतात,तोच कर्तार आहे,तोच सर्वांचा स्वामी आहे,तो त्रिलोकी मध्ये जेथे तेथे भरपूर भरलेला आहे,श्वासोश्वासाने हर जाप करा,तेव्हा मोक्ष मिळेल. ।।६१।।

हिर्णा कुस जाय सो बोहो जोस कीया ।। दुज पास जाय के बर्दान लीया ।।
सेवास पूजा बोहो बिध कीनी ।। तब दुज ऊठ के आसीस दीनी ।।६२।।

याचा भाऊ हिरण्यकश्यपु याने भावास मारणाऱ्यावर फार राग केला,त्यानेही ब्रह्मा जवळ जाऊन वरदान घेतले, या हिरण्यकश्यपुने पुष्कळ तऱ्हेने सेवा पुजा केली, तेव्हा

ब्रह्माने उठून आर्शिवाद दिला. ।।६२।।

**लो काट कंकर बारे न मांही ।। दिनो न राती तुज मोत नाही ।।**
**बर लेह दाणुं अब गांव आये ।। नव खंड मधे अब जुध लाये ।।६३।।**

आर्शिवाद दिला,की,तू लोखंडाने मरणार नाही,लाकडाने मरणार नाही,दगडाने मरणार नाही,घराच्या बाहेर मरणार नाही,घराच्या आत मरणार नाही,तू दिवसा मरणार नाही, रात्रीत मरणार नाही,(अधिक तु मनुष्याच्या हाताने मरणार नाही व जणावरांच्यानेही मरणार नाही,बारा महिन्यात मरणार नाही),या तऱ्हेचा वरदान दिला,हिरण्यकश्यपु आपल्या गांवी हिंदोण येथे आला,आता हा नऊ खंड पृथ्वी मध्ये युद्ध करु लागला. ।।६३।।

**चढ जोस जोई सब मांड घेरी ।। लिया भूप जीती जुगे आण फेरी ।।**
**मेरो नांव गावो सबे पुरस नारी ।। देऊँ रीज भोजा तुमे रेत म्हारी ।।६४।।**

त्याच्या मनामध्ये जोस येऊन सर्व पृथ्वीस घेरुन टाकले,(वळवून घेतले)सर्व पृथ्वीचे राजास जिंकुन आपली आणद्वाही फिरवून दिली,जगातील सर्व स्त्री पुरुष माझ्या नामाचा भजन करा,तुमच्यावर मी खुषी होऊन कृपा करीन,मी इनाम बक्षिस देईन, तुम्ही माझी रय्यत आहा,माझे नाम जपा. ।।६४।।

**कह राम कोई ताहे घेर मारूं ।। भरूं खाल भूसा नखा चीप सारूं ।।**
**जित्यो जुग सारो हवे देव जाही ।। करो जुध मोई मिलो काय आई ।।६५।।**

जर कोणी रामाचे नाम घेईल,तर त्यास धरुन मी मारीन व त्याच्या कातडीत भुस भरीन व त्याच्या नखांत चिपा ठोकून देईन,या तऱ्हेने सर्व जगास जिंकुन,आता देवाकडे चालला व देवास म्हणाला,एक तर माझ्यासी युद्ध कर,नाहीतर माझ्यासी येऊन मिळून,माझे होऊन रहा. ।।६५।।

**कयो इंद सुणो इसी बिध लोई ।। हरि हिरना कुस की पाट जोई ।।**
**कहे देव सारा सुणो इंद राई ।। रखो जोय आणी कया दुजो लाई ।।६६।।**

तेव्हा इंद्राने सांगितले,सर्व लोक ऐका,हरी हिरण्यकश्यपूची पट्टराणी चोरुन नेली, हिरण्यकश्यपुची पाठ (                ),तेव्हा सर्व देव म्हणाले,इंद्र राजा ऐका,तुम्ही या हिरण्यकश्यपुची बायको कयाधू हिला आणून ठेऊन द्या. ।।६६।।

**तबे इंद बोले सुणो सरब देवा ।। आतो बिस्न भक्ता नहि काम एवा ।।**
**रखो देव जतना देहो ग्यान जाई ।। कटे दिन याकां पावे सुख माई ।।६७।।**

तेव्हा इंद्र म्हणाला,सर्व देव हो ऐका,ही कयाधु तर विष्णूभक्त आहे,हिला हरण करुन आणने हे आपले काम नाही,तेव्हा इंद्र म्हणाला,हा हिरण्यकश्यपू तपश्चर्या करण्या करीता गेला आहे, तो पर्यंत देव हो, या कयाधुस यत्नाने ठेवा व हिला जाऊन जाऊन

ज्ञान द्या,(म्हणजे ही गर्भवती आहे,कयाधुस ज्ञान दिल्याने हिच्या गर्भातील बालक ज्ञान ऐकून भक्त उपजेल व हिरण्यकश्यपु तपश्चर्या करुन परत आला म्हणजे, कयाधुला तिच्या घरी पाठवून द्या),कयाधुस ज्ञान दिले म्हणजे हिचे दिवस कटून जातील व हिच्या गर्भातील बालकासही आंत मध्ये सुख मिळेल. ।।६७।।

**तबे रिष नारद नित चल आवे ।। बोहो ग्यान भेवा भेदं बतावे ।।**
**तब देव कन्या ग्रभ आस होती ।। सुण ग्यान धाऱ्यो ग्रभ आप जोती ।।६८।।**

तेव्हा नारद मुनी नित्य चालुन येत असता,कयाधुस ज्ञान सांगत असत व पुष्कळ तऱ्हेचे पुष्कळ ज्ञान व पुष्कळ ज्ञानाचा भेद कयाधुस दाखवित असत,देवकन्या (कयाधु)गर्भवती होती,ते नारदाचे ज्ञान ऐकून गर्भातील बालकाने धारण केले व या युवतीने (कयाधुने) ही ज्ञान घेतले. ।।६८।।

**इन्द देव कन्या घर उलट मे ली ।। प्रहलाद जनमे नायत झेली ।।**
**जुग दोय चोबीस इंद देव राखी ।। घर भेज दीजे कर देव साखी ।।६९।।**

मग पूढे बावीस वर्ष तपश्चर्या करुन हिरण्यकश्यपू घरी आला, तेव्हा इंद्राने देवकन्येस (कयाधुस)घरी पाठवून दिले,(प्रल्हाद आईच्या गर्भात चोवीस वर्ष राहीला),इंद्राने सांगितले,प्रल्हादाचा जन्म आपल्या येथे होऊ देऊ नये,चोवीस वर्ष कयाधुस इंद्राने ठेवले,आता या कयाधुस तिच्या घरी पाठवून द्या व देवास सांगितले तुम्ही जाऊन माझी साक्ष द्या,(की,ही निष्कलंक आहे),याप्रमाणे कयाधुस देवाच्या सोबत हिरण्य–कश्यपुच्या घरी पाठवून दिले. ।।६९।।

**या ग्रभ बालक येते नाही होई ।। हे जन पूरण सुण देव सोई ।।**
**जन गत करन सुर मेल जाई ।। प्रहलाद जलमे उसर घर आई ।।७०।।**

तिच्या गर्भातील बालक येथे होणार नाही,सर्व देव हो ऐका, हिच्या गर्भातील बालक पुरा जन (संत) आहे,असा तो जन गती करणारा देवांनी ठेऊन दिले,आता प्रल्हादाने हिरण्यकश्यपुच्या घरी जन्म घेतला. ।।७०।।

**तब जख के घर होत बधाई ।। धिन दिन धिन भाग अब मुझ भाई ।।**
**प्रहलाद जन्मंत सब हरषाणा ।। नर नार बस्ती उच्छ रंग कवाणा ।।७१।।**

तेव्हा सर्व राक्षसांच्या घरी उत्सव होऊ लागला व हिरण्यकश्यपु म्हणू लागला,माझे भाग्य धन्य व धन्य आजचा दिवस व मला धन्य आहे,प्रल्हाद जन्मल्याने सर्व हर्षायमान झाले,सर्व स्त्री पुरुष व वस्तीचे सर्व लोकांनी उत्सव केला. ।।७१।।

**अबे बरस सात हुवा दोय जाणी ।। कह रिष कूं नित प्रहलाद आणी ।।**
**द्यो ग्यान मोही अदभूत देवा ।। कहो जीव करता सब सीस भेवा ।।७२।।**

प्रल्हाद नऊ वर्षाचा झाला व शंडामुर्कास प्रल्हाद नित्य सांगत असे,मला अद्‌भुत ज्ञान

द्या,असा प्रल्हाद म्हणत असे व जीवांचा कर्ता कोण आहे,याचा भेद मला सांगा. ।।७२।।

**तब रिष बोले त्रिलोक मांही ।। तुज बाप पिता सम कोय नाही ।।**
**पढ एह ग्यानं सुण सुत आई ।। जुध जीत बाता या जुग मांही ।।७३।।**

तेव्हा शंडामुर्का म्हणाला,तुझ्या बापासारखा या त्रिलोकीत कोणीच नाही,हे राजकुमारा, तू हे ज्ञान शीक,या जगामध्ये युद्धांत जिंकण्याच्या गोष्टी तू शीक. ।।७३।।

**तुम राज अंसा ओ ग्यान चहिये ।। जे समस्त ऊठे सब जीत लहिये ।।**
**हिरनाक कूं सो तबे सुण पायो ।। प्रहलाद कूं ततकाळ बुलायो ।।७४।।**

तू राजाचा अंश आहे,तुला तर हे ज्ञान पाहिजे,जर सगस्त कोणी लढाई करण्याकरीता उठला,तर त्या सर्वास जिंकून घेतले पाहिजे,तेव्हा हिरण्यकश्यपुने हे ऐकले,तेव्हा प्रल्हादास तत्काळ बोलाविले. ।।७४।।

**पढ सुत बिद्या आ सुण भाई ।। सब वां कीमत तबे जम जाई ।।**
**प्रहलाद भणबा अब त्यार कीया ।। बोहो संग साथी अब लार लीया ।।७५।।**

हे पुत्रा,ही विद्या शिक व ते ऐक,तेव्हा त्याची मती जमुन जाईल( )व प्रल्हादास विद्या शिकण्याकरीता आता तयार केला,त्याच्या संगे त्याचे सोबती त्याने आपल्या शाळेत घेतले. ।।७५।।

**भणतास गुणता बहु दिन होई ।। आवे न जावे विद्या न कोई ।।**
**श्रीयास कुं भारी मध सेर माही ।। ता होय प्रहलाद पढवास जाई ।।७६।।**

शिकता शिकता पुष्कळ दिवस झाले,परंतु प्रल्हादास विद्या काही येत जात नाही (आलीच नाही),तेथे शहराच्या मधांत श्रीयादे कुंभारीन रहात होती,त्या श्रीयादेच्या घरा समोरुन प्रल्हाद नित्य शाळेत जात असे. ।।७६।।

**वा ब्रम्ह भक्ता स रहे गोप सोई ।। हर जाप हिर्दे नित नेम होई ।।**
**उण एक समे घड़ न्याव भाई ।। ताह माय बिल्ली बच्चास ब्याई ।।७७।।**

ती श्रीयादे कुंभारीन ब्रह्मची भक्ती करणारी होती,ती गावांमध्ये गुप्त रहात होती, (आपली भक्ती कोणास माहीत होऊ देत नव्हती),तिच्या हृदयात हरीची भक्ती होती,ती नित्य नियमाचे जाप करीत असे,या श्रीयादेने एके समयी,मांतीचे भांडे घड्वून आव्यात लावून दिले व आव्यास आग लावून दिली. व आग पेटलेली पाहून पिलांची माय मांजर आव्या भोवती फिरे व म्याऊ म्याऊ करी.।।७७।।

**या मन मधे आवास लेसु ।। ता दिन बच्चा छिछकार देसु ।।**
**दिन पांच पनरा बदीत होई ।। आवास चुणता याद न कोई ।।७८।।**

तेव्हा श्रीयादेस मांजर जन्मल्याची व त्या आव्यातील भांड्यात पिल्ले असल्याची आठवण

झाली,पहिल्याने श्रीयादेच्या मनांत होते,की,ज्या दिवशी मी आवा लावीन, त्यादिवशी मी मांजरीच्या पिल्लास हाणून देईन,परंतु आवा लावण्याच्या वेळी पिल्लांची आठवण श्रीयादेस राहीली नाही, त्या मांजर जन्मलेल्यास वीस दिवस व्यतीत होऊन गेले व आवा लावते वेळी पिलांची आठवण श्रीयादे भुलून गेली. ।।७८।।

**चुण न्याव पूँती गहे आग दीनी ।। तब सुध सोची चीत जीव लीनी ।।**
**कर करणा तब वो बेण भाखे ।। सुण करता हर अे जीव राखे ।।७९।।**

व या आव्यास आग लावून दिली,तेव्हा मांजर आव्याच्या भोवती फिरुन म्याऊ म्याऊ करु लागली,मग श्रीयादेस मांजरीच्या पिलांची आठवण झाली,जित जीव लीनी( ), तेव्हा श्रीयादे करूणा करुन असे वाक्य बोलली,हे कर्तारा ऐक, या जीवांचे रक्षण कर. ।।७९।।

**देहे पर दिखणा डंडोत कीया ।। सत राम कहे जीव शिर सूप दीया ।।**
**श्रीयास मुख सुं केहे राम भाई ।। तिण बार प्रहलाद ऊभोस आई ।।८०।।**

श्रीयादेने प्रदक्षिणा देऊन दंड्वत केला,सत्त रामनाम सांगुन हे जीव त्याच्या सुपरुत केले,श्रीयादेच्या तोंडातुन जेव्हा रामनाम निघाले,त्याच वेळी प्रल्हाद श्रीयादेच्या तोंडातील राम शब्द ऐकल्या बरोबर, श्रीयादेच्या जवळ येऊन उभा राहीला. ।।८०।।

**कर डकर धाकळ कहे बेण सोई ।। ते नाम लीयास सुण कोण होई ।।**
**तब संत श्रीयास या मन धारी ।। अब आज छिपियाँ कुण गत म्हारी ।।८१।।**

व दरडावून धमकावून प्रल्हाद म्हणाला, तू ज्याचे नांव घेतले,तो कोण आहे, ते मला सांगा,जेव्हा श्रीयादेने मनांत हिम्मत ही धरली व मनांत म्हणाली की,आता आज लपून राहील्याने माझी काय गती होईल,आता लपून राहिल्यातही बरेपण नाही,कारण लपून राहीली तर रामजीची गुन्हेगार होईन व खरी हकीगत सांगितली तर,हा राक्षस मला मारुन टाकीन,तर रामजीची गुन्हेगार होण्यापेक्षा राक्षसाच्या हाताने मरावे,याकरीता या प्रल्हादास खरी हकीगत सांगुन द्यावी,मग पुढे काही होवो. ।।८१।।

**इण न्याव माही चुण जीव दीया ।। पेदा करंदा सो नाम लीया ।।**
**प्रहलाद कहे सुण ऊ कोण होई ।। देहे भेद मोने के मारू गोई ।।८२।।**

श्रीयादे प्रल्हादास म्हणाली,या आव्यामध्ये मड्क्यात मांजराची पिले होती,ते मड्क्या मध्ये या आव्यात चिणून,या आव्यास आग लावून दिली,तर मांजरीच्या पिलास वाचविण्याकरीता सर्वास पैदा करणाऱ्याचे नांव घेतले,(या पिलांची रक्षा करण्याबद्दल प्रार्थना केली),तेव्हा प्रल्हाद म्हणाला,तू ऐक,तो पैदा करणेवाला कोण आहे,का तर त्याचा भेद मला दाखीव,नाही तर मी तुला मारुन टाकीन. ।।८२।।

**सुण राम रमता करतार कुवावे ।। जन भीड घाल्या ततकाल आवे ।।**

प्रहलाद बोले ओ न्यांव मोई ।। मो बिन आया काटे न कोई ।।८३।।

तेव्हा श्रीयादे म्हणाली,ऐक,तो राम रमता सर्वांमध्ये रमून राहीला आहे,तोच राम सर्वांचा कर्ता आहे,जन(संत)त्यास भिडीत घातला,त्याचा धावा केला, म्हणजे पुकार केल्याबरोबर तात्काळ येतो,तेव्हा प्रल्हाद म्हणाला,माझे आल्या शिवाय हा आवा कोणी काढू नये. ।।८३।।

दिन रेण एकी सुण दोय भाया ।। आवास हेरत प्रहलाद आया ।।
हेरत हेरत अध बिच आया ।। तब संत श्रीया मन संक खाया ।।८४।।

दिवस रात्र एक गेली व दिवस व रात्रही गेली,आवा शोधते वेळी प्रल्हादाने सांगितल्या वेळेवर प्रल्हाद गेला,ते बासन (मातीचे भाजलेले भांडे)शोधता शोधता मधांत आली, तेव्हा संत श्रीयादेच्या मनांत सशंय आला, ।।८४।।

हे राम हे राम या सुण लीजे ।। अे जीव राख्या बिन जीव दीजे ।।
हेरत हेरत चोफेर ड्रोरा ।। तब पाँच बामण अध बिच कोरा ।।८५।।

की,(या आगीमध्ये पिल्ले कशाची वाचले असतील व पिल्ले जिवंत न निघाल्यास हा मला मारुन टाकील).तेव्हा श्रीयादे हे राम,हे राम,पुकार करुन म्हणाली,ही पुकार माझी ऐकून घे,जर ही मांजरीची पिले वाचविली नाही,तर हा प्रल्हाद माझा जीव घेणार, शोधता शोधता मधांत आली,तर अधा मधात पाच बांसन(मड्के)मधांत बिलकुल कोरे (कच्चे)निघाले.।।८५।।

प्रहलाद आगे तबे आण मेले ।। देखेस मिनियाँ सत्त माह खेले ।।
तब संत प्रहलाद या उर धारी ।। सत राम रामा अवर बिकारी ।।८६।।

ते मड्क्यात पिल्ले जिवंत पाहील्या बरोबर,श्रीयादेने मड्के आणून प्रल्हादाच्या समोर ठेवले,प्रल्हाद पहातो तर,मांजरीची पिले खरेच मड्क्यात खेळून राहीली आहेत,तेव्हा संत प्रल्हादाने ते ह्रदयात धारण केले,की,रामनाम हे सत्य आहे व बाकीचे सर्व बेकार आहेत. ।।८६।।

उर माह दिळ अेह आ कीन आई ।। ज्या सीस ओ राम को मारे भाई ।।
जिण जीव राख्या इण आग सोई ।। सो सत खावंद मयेक होई ।।८७।।

तेव्हा प्रल्हादाच्या मनामध्ये आकीन(विश्वास)येऊन गेला व मनांत विचार केला,की, ज्याच्या मस्तकावर हा राम आहे,त्यास कोण मारु शकेल,ही मांजरीची पिल्ले खुद्द आपण तर काही रामनाम जाणतच नव्हती,ते दुसऱ्याने रामनाम घेतल्याने बचावल्या गेले,मग जो खुद्द रामनाम जाणतो,त्याचे कोण काय करु शकेल,ज्या रामाने अशा आवामध्ये आगीत हे सर्व पिल्ले वाचवून दिले,तोच सत्त खावंद(मालक)आहे,मीच त्याचा पक्का आहो. ।।८७।।

हर नाम धरह प्रहलाद चाल्या ।। चट साल आणी सब बेद पाल्या ।।
को हो राम मारा निरधार सोई ।। सब बेद पिंडत झुठास होई ।।८८।।

तेथून(श्रीयादेच्या घरुन)हरनाम धारण करुन प्रल्हाद चालला व शाळेमध्ये जाऊन सर्व मुले जे शिकत होती,त्यांना ते शिकणे मनाई केले,प्रल्हाद सर्वही मुलांना म्हणाला, सर्वही रामनाम म्हणा,या रामनामाचा सर्व निर्धार (निर्णय) करुन मी आणला आहे,तोच हा राम आहे,सर्व विद्या व विद्या शिकविणारा पंडीत हे सर्व खोटे आहेत. ।।८८।।

चट साल माही या धुन होई ।। बोहो अलि गुंजे ज्युँ बाग सोईं
गणणाट भणणाट के एम फूटे ।। नर नार सुन कान सुख सीर छुटे ।।८९।।

हे ऐकून शाळेमध्ये सर्व मुले रामनाम घेऊ लागली,त्याची(रामनामाची)ध्वनी शाळेमध्ये होऊन गेली,जसे पुष्कळसे भोवरे बागेमध्ये जमा होऊन गुंजारव करतात,त्या प्रमाणे शाळेत ध्वनी होऊन गेली,शाळेमध्ये गणगणाट,भनभनाट असा होऊ लागला,जो कोणी स्त्री पुरुष ऐकतो,त्या सुखाच्या शिरा कारंजाप्रमाणे सुटू लागल्या. ।।८९।।

केहे राम सारा व्हे धुन भारी ।। गुंजे सुं जागा चट साल सारी ।।
नर नार लोई सब चाल आवे ।। कांहा बेद धुन या इचरज क्वावे ।।९०।।

सर्वही मुले रामनाम म्हणू लागली,त्याची भारी ध्वनी गुंजू लागली,त्या शाळेची सर्वही जागा रामनामाच्या ध्वनीने गुंजू लागली,तेथे स्त्री पुरुष सर्वही लोक चालून येऊ लागले व सर्वास ही काय वेद ध्वनी होऊन राहीली आहे,म्हणून आश्चर्य वाटू लागले. ।।९०।।

रिष उण बेल्या नही जाग माही ।। केहे नार पुरषा दुज मरम आई ।।
तब सेंग सारा के हात जोडया ।। मारेस सुर देव मरजाद तोडयां ।।९१।।

त्यावेळी षंडामुर्का मास्तर शाळेमध्ये नव्हते,तेव्हा सर्व स्त्री पुरुष येऊन मुलांस म्हणू लागली,की,ह्या नामाचा तुम्ही जप कराल,तर मास्तर येऊन तुम्हास मारेल,तेव्हा सर्व मुले हात जोडून प्रल्हादास म्हणाली,गुरुची मर्यादा तोडून ह्या नामाचा जप केल्याने, मास्तर आम्हाला मारेल. ।।९१।।

तम कंवर प्रहलाद हम रेत होई ।। हम मार देव तब नाही कोई ।।
तब ऊँठ बोले प्रहलाद बाणी ।। मुझ मार तुम कूं मारेस आणी ।।९२।।

तेव्हा मुले म्हणाली,प्रल्हाद,तुम्ही तर राजकुमार आहा व आम्ही रय्यत आहो,जेव्हा मास्तर(शंडामुर्का)येऊन आम्हास मारेल,तेव्हा आमचा सहाय करणारा कोणीस नाही, तेव्हा प्रल्हाद उठून उभा राहीला व म्हणाला, पहिल्यांदा मला मारेल,तेव्हा मागाहुन तुम्हास मारेल. ।।९२।।

ओ नाम जांको सो धर्म भारी ।। नहि मार सके तिर लोक सारी ।।

को राम सारा डर मत राखो ।। तज बेद पाटी हल बेग भाखो ।।९३।।

प्रल्हाद म्हणाला,हे ज्यांचे नांव आहे,तो फार भारी धर्म आहे,हे रामनाम जो घेतो,त्यास सर्व त्रिलोकी(स्वर्ग,मृत्यु,पाताळ)तिन्ही लोक एकीकडे झाले,तरी मारु शकणार नाही, सर्वही रामनाम म्हणा,कोणाचेही भय ठेऊ नका,ही तुम्ही लिहीण्याची पाटी व वेद शिकणे सोडून पाटी टाकून द्या व बेगी बेगी रामनाम बोला. ।।९३।।

अब सुण लड़का सब केण लागा ।। सब मधिमा सु सुंण एक भागा ।।

दोडयोस चेटी रिष पास आयो ।। चटसाल को उन सब भेद गायो ।।९४।।

आता हे ऐकून सर्वही मुले रामनाम भजन करु लागले,त्या सर्व मुलातुन एक मुलगा हे ऐकून पळून मास्तरला सांगण्यास धाऊन गेला,फार त्वरेने धाऊन मास्तराच्या घरी आला व शाळेचा झालेला सर्व भेद मास्तरला सांगितला. ।।९४।।

तज बेद पाटी कहे राम सोई ।। प्रहलाद लायो ओ पाट कोई ।।

तब रिष जीमत ततकाल भागो ।। पोसाळ माहि राम धुन लागो ।।९५।।

तो पळत आलेला मुलगा मास्तरला म्हणाला,सर्वही मुले वेदाची पाटी सोडून,सर्वची सर्व मुले रामनाम म्हणतात,प्रल्हादाने हा पाठ(धडा)कोठून आणला आहे,तेव्हा षंडामुर्का मास्तर जेवता जेवता(हात धुतल्या शिवाय खरकट्या तोंडाने)तत्काळ पळत आला, येऊन पहातो तर,शाळेत रामनामाची ध्वनी लागुन राहीली आहे. ।।९५।।

तब अेह धाकल रिष हाक किनी ।। या सिख तुमने कहो कुण दीवी ।।

कर रीस भारी कहे बेण खाटा ।। तज अेह लवल्या गेहो हात पाटा ।।९६।।

तेव्हा मास्तराने सर्वास धमाकऊन असा कल्ला केला,की,असे शिक्षण तुम्हास कोणी दिले,ते सांगा,असे सर्वांवर रागावुन तोंडाने सर्वास खट्ट वचन बोलू लागला व सर्वास म्हणाला,ही लवल्या(हे रामनाम घेणे सोडा असे न म्हणता,ही लवल्या सोडा असे मास्तर म्हणाला,कारण हे राक्षस लोक तोंडाने रामनाम म्हणत नसत,म्हणून ही लवल्या सोडा असे मास्तर म्हणाला व पुढेही ज्या ठिकाणी रामनाम म्हणण्याचा प्रसंग येईल, तेथेही रामनाम तोंडाने न म्हणता अधिक काही म्हणेल,ही लवल्या)सोडून हातात पाट्या घ्या. ।।९६।।

प्रहलाद बोले सुणो रिष राई ।। पाटी जो झेला लिख राम माई ।।

झगड़त झगड़त बोहो दिन होई ।। प्रहलाद रिष की माने न कोई ।।९७।।

तेव्हा प्रल्हाद म्हणाला,मास्तर तुम्ही ऐका,आम्ही पाट्या हातात घेऊ,परंतु त्या पाटीवर रामनाम लिहून द्या,(आम्ही रामनाम घेऊन शिकू,पाटीमध्ये आम्हास रामनाम लिहून द्या),असे प्रल्हादाचे मास्तरशी झगडता झगडता पुष्कळ दिवस होऊन गेले, प्रल्हाद मास्तरचे सांगणे काहीच मानत नाही. ।।९७।।

तब रिष के मन बोहो रोस आया ।। बिकराळ बिड रूप धर देह काया ।।
देखत सब कूं मुर्छास होई ।। प्रहलाद बिन जिमु तज प्राण सोई ।।९८।।

तेव्हा मास्तरच्या मनात फार क्रोध आला व षंडामुर्का मास्तरने राक्षसी मायेने विक्राळ, विद्रुप,भयंकर देह धारण करुन,प्रल्हादास भिवविण्यास आला,त्या विक्राळ रुपास पाहून सर्व मुर्च्छीत होऊन गेले,फक्त एक प्रल्हादाशिवाय,बाकीची सर्व मुले मेलेल्या सारखी होऊन पडून गेली,जसा काही त्यांच्यात प्राण राहीलाच नाही,अशी होऊन गेली. ।।९८।।

प्रहलाद ऊपर टटकार आया ।। तज अेह लवल्या के मारूं मो भाया ।।
रिष दात जोड़ा बोहो बिध बाई ।। प्रहलाद मुसक्यो न चसक्यो न भाई ।।९९।।

एकटा प्रल्हाद सचेत राहीला,त्याच्यावर दांत खाऊन आला व प्रल्हादास म्हणाला, प्रल्हाद रामनाम उच्चारण करीत होता,त्यास म्हणाला,ही लवल्या सोड(रामनाम सोड असे न म्हणता,ही लवल्या सोड असे म्हणाला,कारण राक्षस रामनाम तोंडाने घेत नाहीत,म्हणून ही लवल्या सोड असे म्हणाला),नाही तर मी तुला मारीन,षंडामुर्का मास्तराने दांत खाऊन पुष्कळ तऱ्हेने,दांत चाऊन(कर कर दात खाऊ लागला),परंतु प्रल्हाद मुसक्यो न चसक्यो,तम चामस झाला नाही व बिलकुल भ्याला नाही. ।।९९।।

रिष राय उलटा घर जाय बेठा ।। कोहो काहा कीजे प्रहलाद सेठा ।।
पोसाळ माहि हुई धुन भारी ।। फिर रिष ऊठे कोपग बिचारी ।।१००।।

तेव्हा षंडामुर्का मास्तर परत घरी जाऊ लागला व मनात म्हणू लागला,आता काय करावे, प्रल्हाद फार धीट जबरदस्त आहे,(हा काही ऐकत नाही व मला भीतही नाही,मास्तर घरी गेल्यावर प्रल्हाद सर्व मुलास सावध करुन,मुला जवळून रामनामाचे भजन करु लागला),त्याची शाळेमध्ये फार मोठी ध्वनी झाली,तेव्हा अधिक षंडामुर्का मास्तरने कोप करुन विचार केला. ।।१००।।

बिकराळ बिकंटक अधभुत होई ।। रिष राय पोसाळ मावे न कोई ।।
देखत नर नार अड वड पाड़िया ।। घर जात पेली सुण ताव चड़िया ।।१०१।।

विक्राळ,विकंटक,अद्‌भुत रुप धारण करुन आला,तो मास्तर इतका मोठा झाला,की, शाळेमध्ये मावेना इतका मोठा होऊन गेला,त्यास पाहून गावाचेही स्त्री पुरुष पळाले,ते एकाचे वरते एक पडून खाली पडले,ते गावांतील स्त्री पुरुष आपल्या घरी जाण्यापुर्वीच त्यांना ताप चढून आला. ।।१०१।।

प्रहलाद ऊपर रिष आण गुंजे ।। जु इन्दं गाज्या त्यूं आण जूंझे ।।
जन संत सूरो कपेन कोई ।। के रिष हम तम भोळास होई ।।१०२।।

मग तो मास्तर प्रल्हादाचे वरते येऊन गुंजू लागला,जसा विजेचा कडकडात होते व गर्जू

लागतो,त्या प्रमाणे प्रल्हादाचे वरते कड्कड्न गर्जू लागला, तो प्रल्हाद जन व शुरवीर संत तो काही मास्तराच्याने भिऊन कापला नाही व प्रल्हाद मास्तरास म्हणाला, मास्तर तु भोळा आहे. ।।१०२।।

मो सीस खावंद हे सत रामा ।। को मार सक्के सुं कुण रिष कामा ।।
प्रहलाद की मत दृढतास त्रारी ।। रिष राय चाले पचि उलट हारी ।।१०३।।

माझ्या मस्तकावर माझा मालक सत्तराम आहे,मला कोण मारु शकेल,ही मास्तर तुझी रीस(राग केलेला)काय कामा येईल,षंडामुर्का मास्तरने प्रल्हादाची मती व दृढता (पक्केपणा)पाहीली,अधिक षंडामुर्का मास्तर उलटून पचून हारुन आपल्या घरी चालला गेला. ।।१०३।।

रिष सात बेळया यूं कोप कीया ।। प्रहलाद को मन नेक न बीया ।।
पच जुंझ रिष राय अब हार बेठा ।। मन सोच चित्त प्रहलाद सेठा ।।१०४।।

त्या षंडामुर्का मास्तरने सात वेळ असा कोप केला,परंतु प्रल्हादाचे मन थोडेसेही भ्याले नाही,पचून जुंझून षंडामुर्का मास्तर आता हारुन बसुन गेला व मनामध्ये व चित्तामध्ये मास्तर फिकीर करु लागला,आता काय करावे,प्रल्हाद फार धीट जबरदस्त आहे. ।।१०४।।

अब रिष ओ जाब कहे सुण आई ।। प्रहलाद भणिके केहुँ राज जाई ।।
प्रहलाद बोले तत्त काल जावो ।। तम सुं हुवे सो कर बेग लावो ।।१०५।।

तेव्हा षंडामुर्का मास्तर प्रल्हादाजवळ असा जाब सांगितला, प्रल्हाद तू लिहीणे शिक, नाही तर राजास(तुझा बाप हिरण्यकश्यपूस)जाऊन मी सांगतो,तेव्हा प्रल्हाद म्हणाला, जाऊन तात्काळ सांगा,तुमच्याने जे होईल,ते लवकर करा. ।।१०५।।

तम झूठ झूठा हे बाप मेरा ।। हे राम साचा मे पेक चेरा ।।
प्रहलाद बोले कहुँ रिष तोई ।। बिन राम तेरी कुण गत होई ।।१०६।।

तुम्हीही खोटे व माझा बापही खोटा,माझे रामजी खरे आहे,त्या रामजीचा मी पेक (पक्का)चेला(चाकर)आहो,या तऱ्हेने प्रल्हाद षंडामुर्का मास्तरास म्हणाला,अरे मास्तर, रामनामा शिवाय तुझी गती काय होईल. ।।१०६।।

तब रिष के मन तन आग लगी ।। मुझ आड मरजाद सब आज भागी ।।
कर रिष तामस अब पंथ धाया ।। हिर्णाकुस के दर्बार आया ।।१०७।।

तेव्हा हा प्रल्हादाचा उलट उपदेश ऐकून,षंडामुर्का मास्तराच्या शरीरास आग लागुन अंगार झाली व म्हणाला,माझी आड व मर्यादा आज सर्वच तुटून गेली,(उलट हा प्रल्हाद मला उपदेश करतो,की,रामनाम घेतल्याशिवाय तुझी काय गती होईल,असे म्हणून उलट उपदेश करु लागला,याने माझी आड(मान मर्यादा)काहीच ठेवली नाही),

तेव्हा षंडामुर्कने प्रल्हादावर क्रोध करुन रागावून,हिरण्यकश्यपूच्या दरबाराच्या रस्त्यावर धाव घेतली व हिरण्यकश्यपूच्या दरबारात आला. ।।१०७।।

**तब ऊठ राजा सन्मुख होई ।। धिन दिन धिन भाग कहो टेल मोई ।।**
**आप पधारे कहो कुण काजा ।। आधीन अे बेण के सत्त राजा ।।१०८।।**

तेव्हा हिरण्यकश्यपू उठून सामोरा आला व म्हणाला,धन्य माझे भाग्य,धन्य हा दिवस, की,तुम्ही येऊन दर्शन दिले,मला काय टहल(सेवा)करण्यास सांगता,ते सांगा,आपण कोणत्या कामाकरीता आले,ते काम मला सांगा,आधीन होऊन हे वचन हिरण्यकश्यपू राजा बोलला. ।।१०८।।

**तब रिष बोले सुण बेण राई ।। प्रहलाद मरजाद माने न काई ।।**
**तुमरी हमरी सब तोर डारी ।। केहे नाव शत्रु पोसाळ सारी ।।१०९।।**

तेव्हा षंडामुर्का मास्तर म्हणाला,हे राजा, माझे वचन ऐक,प्रल्हाद माझी मर्यादा काहीच मानीत नाही,तुमची मर्यादा व माझी मर्यादा सर्वच प्रल्हादाने तोडून टाकली,सर्वही शाळेतील मुले शत्रुचे नांव घेतात,(राक्षस आपल्या तोंडने रामाचे नांव घेत नाही,म्हणून शत्रुचे नांव घेतात,असे म्हणाला.) ।।१०९।।

**सुण तब हिर्णाकुस कोपस कीया ।। रिष लार जोधा बलवान दीया ।।**
**तब रिष केहे सुणज्यो सब कोई ।। हे राजा इनके बस न होई ।।११०।।**

हे ऐकून हिरण्यकश्यपूने प्रल्हादावर कोप केला व मास्तरच्या सोबत फार बलवान बलवान योध्दे पाठवू लागला,तेव्हा षंडामुर्का मास्तर म्हणाला,तुम्ही सर्वही ऐका,षंडामुर्का हिरण्यकश्यपूस म्हणाला,हे राजा,प्रल्हाद या योध्यांच्या वश होणार नाही. ।।११०।।

**बोहो बिध हुन्नर मै सुण कीया ।। हुवा गज रीछ धर रूप लीया ।।**
**बिकराळ बिन डोल अध भूत होई ।प्रहलाद काप्यो न संक्यो नकोई ।।१११।।**

मी ही पुष्कळ तऱ्हेने हुन्नर केले,ते ऐका,मी मोठा हत्ती बनुन प्रल्हादास भिवविले व मोठा मावेना इतका भयंकर मोठा अस्वल बनुन भिवविले,मी असे असे रुप घेऊन भिववीले,मी विक्राळ बिनडोळ(ज्याचा काही डोळ नाही,तोंड कोणी कडेही,तर दांत कोणी कडेही व डोळे कोणी कोणीकडे, तर दांत कोणीकडे,कोठे हात,तर कोठे पाय या तऱ्हेने बिनडोळ)अद्‌भुत बनलो,परंतु प्रल्हाद कंपलाही नाही व भ्यालाही नाही व मनांत संकोचलाही नाही. ।।१११।।

**अे बेण रिष का सुण तब लीया ।। तब भूप मन माय चित नेक बीया ।।**
**जब भूप बोले सुण रिष राई ।। प्रहलाद साझे दूँ समझाई ।।११२।।**

हे मास्तरचे वाक्य हिरण्यकश्यपूने ऐकून घेतले,तेव्हा हिरण्यकश्यपू राजा मनामध्ये थोडा भ्याला,तेव्हा हिरण्यकश्यपू राजा म्हणाला,मास्तर तुम्ही ऐका,प्रल्हादास आज मी

समजाऊन देईन,(की माझ्या शत्रूचे नांव घेणे कसे असते,हे प्रल्हादास मी समजाऊन देईन).।।११२।।

**तुम दुख मानो मत कोय सोई ।। को राम को जूग जीवत मोई ।।**
**रिष राय उलटे अब घर आया ।। प्रहलाद ऊपर हुवो कोप भाया ।।११३।।**

तुम्ही मनामध्ये काही दु:ख मानु नका, माझ्या जिवंतपणी जगांमध्ये राम कोण आहे व राम काय वस्तु आहे,हे ऐकून, षंडामुर्का मास्तर उलटून आपल्या घरी आला,इकडे हिरण्यकश्यपूने प्रल्हादावर कोप केला. ।।११३।।

**सब राज लोके आ बात होई ।। प्रहलाद हर नांव केहे राम सोई ।।**
**सब सोच करके आ बात बूझी ।। प्रहलाद कूं कोहो काहा एह सूझी ।।११४।।**

ही गोष्ट सर्व राजवाड्यात व सर्व लोकातही गोष्ट होऊन गेली व प्रल्हादावर राजाने कोप केला आहे (व असा पण केला आहे,की,प्रल्हादास मारल्याशिवाय अन्न व पाणी घेणार नाही,असा राजाने खण(पण)घेतला आहे,प्रल्हाद हरनाम(रामनाम)बोलून राहीला आहे व सर्व मुलांसही बोलवून राहीला आहे,सर्वांची फिकीर करुन ही गोष्ट विचारली व सर्व म्हणाले,प्रल्हादास ही काय गोष्ट सुचली. ।।११४।।

**हिर्णाकस कू सासो अन्न नाही खावे ।। कद सांझ होवे प्रहलाद आवे ।।**
**तब माय कह कोऊ ततकाल जावो । प्रहलाद कूं कोहो घर नाहि आवो ।।११५।।**

हिरण्यकश्यपूस सांसा(फिकीर)झाली,त्याने अन्न खाणे सोडले व हिरण्यकश्यपू म्हणतो, संध्याकाळ केव्हा होईल व प्रल्हाद केव्हा घरी येईल,(त्या प्रल्हादास मारुन मग मी अन्न पाणी घेईन,तर संध्याकाळ केव्हा होईल व प्रल्हाद केव्हा घरी येईल),तेव्हा प्रल्हादाची आई(कयाधु)म्हणाली,कोणी शाळेत तात्काळ जावा व प्रल्हादास सांगा,की, आज घरी येऊ नको. ।।११५।।

**तुम सीस पिता बोहो कोप कीया ।। अन पान का खण सुण राय लीया ।।**
**प्रहलाद केहे घर जावो उलट सोई ।। के राय सेती हल बेग होई ।।११६।।**

व प्रल्हादास जाऊन सांगा,तुझ्यावर तुझ्या बापाने फार क्रोध केला आहे व राजाने अन्न खण(पण)घेतला आहे,ही गोष्ट बांदीने(दासीने)जाऊन प्रल्हादास सांगितली,तेव्हा प्रल्हाद म्हणाला,तुम्ही सर्वही उलटून घरी जा व राजास सांगा, लवकर जलदी तयार हो. ।।११६।।

**मैं ऊठ आहि ततकाल आऊँ ।। के माय सेती छिप काहाँ माऊँ ।।**
**जा उलट पाछी ओ बेण भाखे ।। के माय सेती मत भे राखे ।।११७।।**

मी येथून उठून तत्काळ येतो व माझ्या आईलाही सांगा,की,मी लपून आता कोठे मावणार नाही, तुम्ही लवकर परत जा, या प्रमाणे प्रल्हाद दास्यांना म्हणाला व माझ्या

आईस सांगा,तू काही भय ठेऊ नको. ।।११७।।

**मै सरण जाकी सो साम अेवा ।। तिरलोक करता सब सेंग देवा ।।**
**कह माय कूं जाय मत सोच राखो ।। प्रहलाद लेवे सुण नांव वाको ।।११८।।**

मी ज्याचा शरणा घेतला आहे,तो स्वामी असा आहे,तो त्रिलोकीचा कर्ता(करणेवाला) आहे व सर्व देवाचाही कर्ता आहे व माझ्या आईला जाऊन सांगा,की,तू फिकीर तर ठेऊ नको,प्रल्हाद तर त्याचे नांव घेतो, ते ऐका. ।।११८।।

**तब ऊठ बांदी माँ पास आई ।। तम बात प्रहलाद मन नाहि भाई ।।**
**केहे बेण अेवा नेह तोड़ सारा ।। प्रहलाद कूं कुछ भयो हे बिचारा ।।११९।।**

तेव्हा बांदी(दासी)प्रल्हादाच्या आईजवळ आली व म्हणाली,तुमची जी गोष्ट तुम्ही सांगितली,ती प्रल्हादाच्या मनात भावली नाही,तो प्रल्हाद तर असे वचन बोलतो सर्व नेहेतोड,(बिन मुलाजाचे कोणाचाही मुलाजा न ठेवता),असे सर्व वचन बोलून राहीला आहे,दासी म्हणाली,प्रल्हादास काही ना काही झाले आहे. ।।११९।।

**मे दिष्ट देखी हेरान होई ।। प्रहलाद बोले सुण ओर कोई ।।**
**हे रानी हेराण सुण जाब अेवा ।। काहा भूप राजा अदभूत भेवा ।।१२०।।**

ते राणी,मी प्रल्हादास दृष्टीने पाहून हैराण झाली,(विस्मीत झाली)की,हा प्रल्हाद बोलून राहीला आहे,(प्रल्हाद तर असे बोलणारा नव्हता,हा तर अधीक दुसराच कोणी बोलतो,या प्रमाणे मी पाहून हैराण झाली,हे राणी,मी त्याचा जबाब असा ऐकून हैराण झाली),त्याच्यापुढे काय तर भुप(हिरण्यकश्यपू राजा),त्याचा तर अद्भुत भेद दिसतो. ।।१२०।।

**बोलत अेसो तप तेज माई ।। हे रानी ता सीस ज्युँ कोय नही ।।**
**केहे केहे राम इण बिध सोई ।। हे रानी मे देख हेरान होई ।।१२१।।**

तो प्रल्हाद असा बोलतो,त्याच्यात तप व तेज त्याच्या बोलण्यात फार भारी दिसते,हे राणी,जसा प्रल्हादाच्या मस्तकावर मालक कोणी नाही,(असा बोलून राहीला आहे),तो हिरण्यकश्यपू आपल्या वरते आहे,असे काही समजत नाही,सर्वचे सर्व राम या विधीने बोलून राहीले आहे,हे राणी, मी तर पाहून हैराण होऊन गेली. ।।१२१।।

**सुण राणी अे बेण बोहो सोच कीयो ।। प्रहलाद कू भेव किण ग्यान दीयो ।।**
**तब सोच राणी या सुध कीवी ।। मन माहि जाण्यो श्रीयास दीवी ।।१२२।।**

कयाधू राणीने ही गोष्ट ऐकून फार फिकीर केली व विचार केला,की,प्रल्हादास हा भेद व हे ज्ञान कोणी दिले,मग राणीने विचार करुन ही सुध्द केली व मनांत समजली,हे ज्ञान श्रीयादेने जरुर दिले आहे,कयाधुस माहीत होते,की,श्रीयादे ही भक्त आहे,त्या शहरात श्रीयादे शिवाय दुसरा कोणी आज्ञा देणारा नाही. ।।१२२।।

अब सांझ होई प्रहलाद ध्याया ।। श्रीयास देके घर पास आया ।।
मे शिष तुम गुरू दे सीख मोई ।। हे राम केसा कुण जाग होई ।।१२३।।

आता संध्याकाळ झाली,तेव्हा प्रल्हाद घरी जाण्यास निघाला व श्रीयादेच्या घराजवळ आला,श्रीयादेस प्रल्हाद म्हणाला,मी तर तुझा शिष्य आहो व तू माझी गुरु आहे,आता मला तू उपदेश दे,तो सांगितला,तो राम कसा आहे व कोणत्या जागी आहे.।।१२३।।

श्रीयादेवी वाच ।।

दिष्टोन मुष्टो घर ठाम नाही ।। जिम पोप बासें सब घट माहि ।।
धर प्याळ आकास भ्रपूर बारे ।। बिन छेह बिन थाह हे राम सारे ।।१२४।।

श्रीयादे म्हणाली,तो राम दृष्टीने दिसत नाही व मुठीत धरल्या जात नाही, त्यास घरही नाही व त्याचे राहण्याचे ठिकाणही नाही,तर जसी फुलामध्ये सुंगधी असते,(ती सुंगधी डोळ्याने दिसत नाही व धरल्याही जात नाही,या प्रमाणे तो राम सर्व व्यापी आहे),तो राम सर्व घटामध्ये आहे,तो धरणीमध्ये,पाताळामध्ये व आकाशात सर्वत्र व आकाशाच्या बाहेरही भरपूर राहीला आहे,त्याचा शेवटही येत नाही व त्याचा थागही लागत नाही,तो राम सर्वत्र सर्वव्यापी आहे. ।।१२४।।

जर खाण इण्ड खाण उद बुद होई ।। नर खाण प्रगट हे राम सोई ।।
सुण भेव वां को कहुँ तुज मोई ।। प्रहलाद वा सम अवर न कोई ।।१२५।।

तो जरा खाणीमध्ये व अंड खाणीमध्ये व उद्‌भिजमध्ये,मनुष्य खाणीमध्ये तो राम प्रगटतो, तो तोच राम आहे,त्याचा सर्व भेद मी तुला सांगतो,तो सर्व ऐक,हे प्रल्हादा, त्याच्या बरोबरीचा कोणीच नाही. ।।१२५।।

कहुँ भेद जूनो डर मत राखे ।। प्रहलाद निर्भे होय बेण भाके ।।
आगे स हिर्णाक सुण भूप बागो ।। सो धरण ऊँधी करणेस लागो ।।१२६।।

मी तुला पुर्वीचा एक जुना भेद दाखविते,तू भय काहीच ठेऊ नको,प्रल्हाद निर्भय आहो, असे बोलू लागला,तेव्हा श्रीयादे म्हणाली,तुझा मोठा चुलता पुर्वी हिरण्याक्ष राजा झाला, तो हिरण्याक्ष पृथ्वीस या धरणीस उलटी करु लागला. ।।१२६।।

तब हर बाराह सुण रूप धार्‍यो ।। वा अंग प्रगटे उण सायत मार्‍यो ।।
फिर सुण संखा बेद हरिया ।। ता बेर मछ कछ अवतार धरिया ।।१२७।।

तेव्हा या हरीने डुकराचे रुप धारण केले व त्याच्याच(हिरण्याक्षाच्याच)अंगातुन प्रगट होऊन,त्याच्याशी त्याच वेळी,हजार वर्षपर्यंत युद्ध करुन त्यास मारुन टाकले व अधिक एक शंखासुराने ब्रह्माचे वेद चोरले,त्यावेळीही त्याने मासोळीचा अवतार घेतला. ।।१२७।।

सुण स्याय घाटे तब मर्‍योड डार्‍यो ।। ओ नांव प्रहलाद काहुँ नाहि हार्‍यो ।।

**हे बोत गाथा सुण राम भारी ।। प्रहलाद मान सत्त बात मारी ।।१२८।।**

ते ऐक,त्या शंखासुरास मुरगाळून घाटावर टाकले,(तेव्हा पासुन शंखास मुरगाळलेले, पीळ दिलेला व एका हाताने त्याचे तोंड धरल्यामुळे,तोंडात बोटाचे हिंदाण व दुसऱ्या हाताने मुरगाळल्याने,पिळ दिलेला सर्व शंखास उत्पन्न होऊ लागला, परंतु एक शंखास मुरगाळलेले,तो सर्वच शंखास पीळ कसा बसला,शंख हा समुद्र मंथनाच्या वेळी, समुद्रातून चौदा रत्ने निघाली,त्या चौदा रत्नात शंख हा ही आहे,समुद्र मंथनाच्या वेळी ही लक्ष्मी समुद्रातून निघाली,त्याच लक्ष्मीने शंखासुर उत्पन्न केला),हे प्रल्हादा,हे नाम कोठेही आजपर्यंत हारले नाही,हे प्रल्हादा, या रामनामाची गाथा तर फार भारी आहे,हे रामनाम फार भारी आहे, प्रल्हाद, तु माझी सर्व गोष्ट मानुन घे. ।।१२८।।

**प्रदिखणा दे डंडोत कीया ।। अब पाव प्रहलाद घर दिस दीया ।।**
**अब राज लोक माँ पास आया ।। तिण बेर हिर्णाकुस सुणज पाया ।।१२९।।**

तेव्हा प्रल्हादाने श्रीयादेस प्रदक्षिणा घालुन श्रीयादेस दंड्वत केला,आता प्रल्हादाने घराकडे पावले दिली,तो राजलोकांत आईजवळ आला,तेव्हा हिरण्यकश्यूपने प्रल्हाद आल्याची बातमी ऐकली. ।।१२९।।

**सुण राज राणी सुण दोड़ आई ।। देहे सीख प्रहलाद कूं अेह बेन भाई ।।**
**हे कंवर हे कंवर तज अेह बाणी ।। जप नाम प्रीतम सब जुग झेली ।।१३०।।**

तेव्हा राजाच्या राण्या सर्व धाऊन आल्या,तेव्हा त्या प्रल्हादास सर्व शिकवू लागल्या व म्हणाल्या,हे राजकुमार,हे राजकुमार,तू हे जे तोंडाने बोलून राहीला आहे,त्याचे नांव घेणे सोडून दे,(राम नाम घेणे सोडून दे,असे न म्हणता,अशा म्हणाल्या,की,हे तू बोलतो हे नाम घेणे सोडून दे,अशा म्हणाल्या,कारण राक्षस तोंडाने रामाचे नाम घेत नाही). ।।१३०।।

**ले मांड सारी सो नाम लीजे ।। हे पुत्र प्रहलाद ओ छोड दिजे ।।**
**तम बाप पिता को नाम होई ।। हे पुत्र प्रहलाद ले सब कोई ।।१३१।।**

हे सर्व जगाचे लोक जे नाम घेतात,तेच नांव तुही घे,सर्व जगाचे लोक तुझ्या बापाचे नांव घेतात,तुही त्याचे नांव घे,हे पुत्र प्रल्हादा,तू हे सर्व नाम सोडून दे,(हे नाम सोडून दे,अशा म्हणाल्या,परंतु रामनाम सोड अशा बोलल्या नाही),तुझ्या बापाचे जे नाम आहे, हे पुत्र प्रल्हादा,तुझ्या बापाचेच सर्वजण नाम जपतात. ।।१३१।।

**तुम राय के पुत्र हो ईधकारी ।। सो आज बिगड़े सुण बात थारी ।।**
**हे पुत्र पुत्र तज राम दीजे ।। सुण तोहि पिता को नाम लीजे ।।१३२।।**

तू राजाच्या राजपुत्र,राज गादीचा अधिकारी आहे,तेच आज तुझी गोष्ट ऐकून,तुझा युवराजपणा बिघडून राहीला आहे,हे पुत्रा,तु हे नाम सोडून दे,तु ऐक,तु तुझ्या बापाचेच

नांव घे. ।।१३२।।

कह राव राणी सुण गत सारो ।। सो नाम प्रहलाद क्यूं नाहि धारो ।।
तुम कु हम बिन क्युँ कर समझ आई ।ओ नाव हम कब सुणियो न भाई ।।१३३।।

सर्वांनी तुझ्या बापाची गती जाणून त्याचे नांव घेतात,तेच नाम(तुझ्या बापाचे नाम तू का धारण करीत नाही,अरे,तुला आमच्या शिवाय ही समज कोठून आली,हे जे तू नांम घेऊन राहीला आहे,ते नांव आम्ही तर पुर्वी केव्हाही ऐकले नाही,(तोंडाने रामनाम न म्हणता,तु जे नांव घेतो ते आम्ही पुर्वी केव्हाही ऐकले नाही,अशा म्हणाल्या,परंतु रामाचे नाम तोंडाने बोलल्या नाही).।।१३३।।

प्रहलाद वाच ।।

प्रहलाद बोले तुम काहां जानो ।। ओ नांव करतार मो मन भानो ।।
आकास पाताळ हर नांव टेके ।। मांह न बारे भ्रपूर देखे ।।१३४।।

प्रल्हाद उवाच:–तेव्हा प्रल्हाद म्हणाला,या रामनामाचे महत्व तुम्ही काय जाणता,हे नाम सर्व जगाचा कर्तार आहे,हे माझ्या मनात मानले आहे,आकाश व पाताळ सर्व या हर नांवाच्या टेक्याने आहे,तो आंतही नाही व बाहेरही नाही,त्यास मी भरपूर पहातो. ।।१३४।।

तम निपट भोळी घर जाय बेसो ।। हो जात बेगम क्या सीख देसो ।।
तब रोस करके सब उलटे चाली ।। केहे माय सेती देहो तम पाली ।।१३५।।

तुम्ही तर अगदी भोळ्या आहा,तुम्हास काही समजत नाही,तुम्ही तुमच्या घरी जाऊन बसा,तुमची जातच बेगम,म्हणजे तुम्हास कशाचीही गम(माहीती)नाही,अशी तुमची जात बेगम आहे,तुम्ही मला काय ज्ञान देऊन राहिल्या आहेत,तेव्हा सर्व राण्या रागावून उलटून परत जाऊ लागल्या व प्रल्हादाच्या आईस बोलल्या,तूच प्रल्हादास हा नाम घेणे मना करुन दे व प्रल्हादास हा नाम घेणे मना करुन समजाऊन दे. ।।१३५।।

माता उवाच ।।

हे पुत्र प्रहलाद सुण बात म्हारी ।। आ प्रमभक्ति निभे नहि थारी ।।
सुन आज तोय बाप जोरेस होई ।। नहि कर सक्के आ भक्त कोई ।।१३६।।

माता उवाच :– तेव्हा प्रल्हादाची आई प्रल्हादास म्हणाली,हे पुत्र प्रल्हादा,तू माझी गोष्ट ऐक,।।आ परमभक्ती,निभे नाय थारी।।(      ),आज तुझा बाप जोरात आहे,तुझा बाप जोरात असल्यामुळे,ही भक्ती कोणी करु शकत नाही,तू हे नांव घेतोस. ।।१३६।।

लो गोप हिरदे हर नाव धारी ।। हे पुत्र प्रहलाद सुण सिख म्हारी ।।
जे लाडु पायो तो गोप खईये ।। हे पुत्र प्रगट कहि कु कहिये ।।१३७।।

तर हे नांव गुप्तपणे हृदयात धारण करुन घे,हे पुत्र प्रल्हादा,मी सांगते ते मानुन घे,जर लाडू मिळाला,तर त्यास गुप्तपणेच लपून खाल्ला पाहिजे,हे पुत्र प्रल्हादा,प्रगट(उघडपणे)

कशाकरीता म्हणावे,(लपून गुपचूप पणे कोणासी न सांगता लाडू खाऊन घ्यावा). ।।१३७।।

मन माहे समझे तो पूत सेणा ।। करे झोड़ बारे सो नीच केणा ।।
बुध हीण की सुण अेह बात होई ।। के बक बारे देहे भ्रम खोई ।।१३८।।

हे पुत्रा,जो मनामध्ये समजून जातो,तोच पुत्र शहाणा आहे व बाहेर झोड (जिकर करुन सांगतो) त्यास नीच म्हणावे,बाहेर सांगणेही बुद्धिहिनाची गोष्ट आहे,तो तोंडाने बकून बाहेर सांगतो,तो आपला भ्रम गमाऊन देतो. ।।१३८।।

बक बाद बेधो सुण काय कीजे ।। हे पुत्र अवरा किम दुख दीजे ।।
ओहि नांव मेरे हिरदेस होई ।। सुण पुत्र मो जाळ जाणे न कोई ।।१३९।।

हे प्रल्हादा,बकवाद व बेधा(गलबला)कशाकरीता करावा,हे पूत्रा,तोंडाने म्हणून दुसऱ्यास दु:ख कशाकरीता द्यावे,हे जे तू नाम घेतो,तेच नाम माझ्याही हृदयात आहे,प्रल्हाद पुत्रा ऐक,माझा जाप कोणीही ऐकत नाही,(की,ही कयाधू नाम जप करीत असते,हा माझा जाप कोणासही बाहेर माहीती झाला नाही).।।१३९।।

प्रहलाद उवाच ।।

हो माय ओ बेण मो मन भायो ।। तम पास क्या सू किण रीत आयो ।।
कोहो रीत गुरू देव सुण कोण होई । हे माय धिन भाग कोहो भेव मोई ।।१४०।।

प्रल्हाद उवाच:-तेव्हा प्रल्हाद म्हणाला,हे आई,तुझे बोलणे मला फार चांगले वाटले,हे रामनाम तुझ्या जवळ कोठून व कोणत्या रीतीने आहे,ते मला सांग व तू ही सर्व रीत मला सांग,तुझा गुरु कोण आहे,ते मला सर्व रीत सांग,हे आई,तुझे भाग्य धन्य आहे,ते सर्व भेद मला सांग. ।।१४०।।

माता उवाच ।।

हे सुत सब तोहे कहुँ बोहोत गाथा ।। काहा लग कहिये सुण सेंग बाता ।।
इंद देव मो कु हर लेर ग्याथा ।। तू ग्रभ था सुत सुण अेह ब्याथा ।।१४१।।

मी गोष्ट तुला कोठ पावेतो सांगू ,इंद्रदेव मला हरण करुन घेऊन गेला होता,त्यावेळी तू माझ्या गर्भात होता,ती तु गोष्ट ऐक. ।।१४१।।

नारद मुनि वां ग्यान दीयो ।। सो सुण हिरदे मै धार लियो ।।
नारद मुनि गुरूदेव कुवाया ।। ओ नांव मो पास इण रीत आया ।।१४२।।

नारद मुनीने तेथे मला ज्ञान दिले,ते नारद मुनीचे ज्ञान ऐकून मी हृदयात धारण करुन घेतले,याप्रमाणे माझा गुरु नारद झाला,हे राम माझ्याजवळ या रीतीने आले. ।।१४२।।

प्रहलाद उवाच ।।

धिन माय धिन भाग धिन आप होई ।। हो माय ओ नांव करतार मोई ।।
ओ नांव ज्या पास सो काय बीये ।। हो माय ध्रिकार पत छोड जीये ।।१४३।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

प्रल्हाद म्हणाला,हे आई,तु धन्य आहे,धन्य तुझे भाग्य व आपणही धन्य आहो,हे आई, हे नाम सर्वांचा कर्तार(करणेवाला)आहे,हे ज्याच्याजवळ हे नाम आहे,तो कोणासही कशा करीता भिईल,हे आई,तुला धिक्कार आहे,की,या नामाची पत सोडून जिवंत आहेस. ।।१४३।।

काहा अब तुम कू कहियेस आई ।। हो माय ध्रिकार पत छोड क्याही ।।
सुण जात नारी भावेस होई ।। पत छाड़ खावंद के नाहि लोई ।।१४४।।

आता मी तुला काय येऊन सांगू,हे आई,तुला धिक्कार आहे,की,तू पत सोडणारी म्हणविली,तू एक स्त्री जातीची कशीही असली,तरी ती पत सोडून दूसऱ्यास मालक म्हणणार नाही. ।।१४४।।

सुण गोप बिणजे सो चोर होई ।। हो माय माहा जुग लुकियो न कोई ।।
जो माय बरज्या रेवेस कोई ।। तो सुण कारज पक्के न कोई ।।१४५।।

अधिक ऐक,जो गुप्त व्यापार करेल तो चोर आहे,हे आई,जगामध्ये सावकार कोणीही लपून बसुन राहीला नाही,हे जो कोणी दुसऱ्याच्या मना केलेला राहील,त्याचे कार्य पकडणार नाही,ते ऐका. ।।१४५।।

माता उवाच ।।

हे पुत्र प्रहलाद सोइ बाव बाजे ।। तिण बेर तेसी सुण सरण छाजे ।।
ज्या बेर जाकी सो ओट गहिये ।। सुण रेण मध रवि काय कहिये ।।१४६।।

आई म्हणाली,हे पुत्र प्रल्हादा,ज्यावेळी जसा वारा राहील,त्या वेळी तशीच शरण घेणे शोभेल,ज्यावेळी ज्याची वेळ असेल,त्यावेळी त्याचाच आश्रय घेतला पाहिजे,हे प्रल्हादा, ऐक,रात्रीच्या वेळी सुर्य कशाकरीता म्हणावा. ।।१४६।।

प्रहलाद उवाच ।।

हो माय दीन सूर सरणो केहे रात चंदो ।। धरणीस केता दिन रात बंधो ।।
सिंह घास खाता सुणियो न कोई ।। दस पाँच लंघण भावेस होई ।।१४७।।

प्रल्हाद म्हणाला,दिवसा सुर्याचा शरणा व रात्री चंद्राचा धरण्यास म्हणतात,दिवस रात्रीने बांधली आहे,सिंह गवत खाताना कोणी पाहीला नाही,सिहांस दहा पांच लंघन(उपवास) कितीही झाले,तरी सिंह गवत खाणार नाही. ।।१४७।।

खज छाड़ दूजो खायो न जावे ।। पत छाड़ बोले वा झूट कवावे ।।
कुळ सेंग लाजे सुण गोत सारो ।। हर बिन हो माय युं जन्म हारो ।।१४८।।

तरी सिंहाने आपले खाद्य सोडून दूसरे काही खाल्या जाणार नाही,जी स्त्री पत सोडून बोलते तीस खोटी म्हणतात,त्या स्त्रीचे सर्व कुळही लाजेल व तिचे सर्व गोत्रही लाजेल, हे आई,हर शिवाय असा जन्म हारते. ।।१४८।।

गेहराव सरणो सुण ओर कोई ।। हो माय ताकू पट्टा न होई ।।

जो जीव जावे तो जाण दीजे ।। हो माय दुजो सरणो न लीजे ।।१४९।।

राजाचा शरणा धरणे सोडून दुसऱ्याचा शरणा घेईल,त्यास जहागिरी मिळणार नाही,तर जीव जाईल तर जाऊ द्या, तरी दुसऱ्याच्या शरणा घेऊ नये. ।।१४९।।

धिगताही धिग ताहि हर जाप छाड़े ।। हो माय खुनी कहाँ मुख काढे ।।
सुण काम भेळा दोऊ एक जाणे ।। हो माय ताकू कोहो कोण माने ।।१५०।।

त्यास धिक्कार आहे,जो हरनामाचा जाप करणे सोडेल,त्यास धिक्कार आहे,हे आई, तो खुनी(अपराधी)कोठे तोंड काढेल,एक दोन्ही काम एके ठिकाणी जाणेल,(जसा तू हरनामाचाही जाप करतेस व इकडे हिरण्यकश्यपूसही मानतेस,असे दोन्ही काम एका ठिकाणी जाणते),तर दोन्ही काम मानणाऱ्यास कोण मानेल,(जसे इकडे नवऱ्याची बायको बनली राहते व तिकडे दुसऱ्याशी व्यभिचारही करते,अशा पत्नीस तिचा पती मानेल काय.)।।१५०।।

मै राम छाडू तो राम द्वाई ।। गुरूदेव लाजे हर बिड़द माहि ।।
तम मोही अे जाब कब नाहि केणा ।। हो माय हर कूं ऊँ जाब देणा ।।१५१।।

मी रामाची शपथ घेऊन म्हणतो,रामनाम मी काही सोडणार नाही व जर रामनाम सोडून दिले,तर माझे गुरुदेव लाजेल व रामाच्या ब्रिदामध्ये तु मला हा जबाब,(रामनाम सोडण्याबद्दल)केव्हाही सांगु नये,हे आई,हर(रामजीस)तेथे जबाब देणे आहे.।।१५१।।

।। इति ग्रंथ भक्त माल संपूरण ।।